POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२१० ● मुंबई, बुधवार, ०४ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## दुबईत अडकलेल्या भारतीयांना दिलासा

### मध्यपूर्व तणावानंतर उड्डाणाला सुरुवात, प्रवासी मुंबईत दाखल




**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मध्यपूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर काही दिवसांपासून विस्कळीत झालेल्या हवाई वाहतुकीत आता हळूहळू सुधारणा होत असल्याचे चित्र दिसत आहे. सोमवारी रात्री (दि.२) छत्रपती शिवाजी महाराज इंटरनॅशनल एअरपोर्ट येथे दुबईहून आलेले एमिरेट्सचे विमान सुरक्षितपणे उतरले आणि अडकलेल्या प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

**उड्डाण रद्द; शेकडो प्रवासी अडकले**

माहितीनुसार, मागील काही दिवसांपासून मध्यपूर्वेतील संघषार्मुळे अनेक आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली होती. त्यामुळे मुंबईसह भारतात येणारे शेकडो प्रवासी दुबईसारख्या ट्रान्झिट केंद्रांवर अडकून पडले होते. सोमवारी रात्रीचे हे आगमन म्हणजे परिस्थिती हळूहळू पूर्वपदावर येत असल्याचे संकेत मानले जात आहेत.

**'सुरुवातीला तांत्रिक बिघाड वाटला' - प्रवाशांचा अनुभव**

दुबईहून मुंबईत परतलेल्या अजय यांनी सांगितले की, ते मूळतः दुबईहून अमेरिकेला जाणार होते. "सुरुवातीला विमान उड्डाण घेत नसल्याने तांत्रिक बिघाड असावा असे वाटले. मात्र सात-आठ तासांनंतर युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती देण्यात आली," असे त्यांनी सांगितले. अडकलेल्या प्रवाशांसाठी एमिरेट्सने बस आणि हॉटेलची व्यवस्था केली होती. "मुंबईला जाणारे उड्डाण सुरू होत असल्याचे कळताच आम्ही तातडीने परतण्याचा निर्णय घेतला," असे त्यांनी नमूद केले.

**हवाई निबंर्धामागचे कारण काय?**

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिकन आणि इस्रायली हल्ल्यानंतर इराणकडून प्रत्युत्तरादाखल ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आले. त्यानंतर अनेक देशांनी आपापले हवाई क्षेत्र मर्यादित केले होते. परिणामी आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर मोठा परिणाम झाला आणि विशेषतः गल्फ देशांमध्ये हजारो भारतीय प्रवासी अडकून पडले.

**पुढील काही दिवसांत परिस्थिती सुधारण्याची शक्यता**

तथापि, आता मात्र उड्डाणे टप्प्याटप्प्याने सुरू होत असून, पुढील काही दिवसांत मुंबईत परतणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

**दुबई विमानतळावर मर्यादित उड्डाणे सुरू**

दरम्यान, २ मार्चच्या संध्याकाळपासून मर्यादित उड्डाणांना परवानगी देण्यात आली आहे. दुबई इंटरनॅशनल एअरपोर्ट आणि अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून काही उड्डाणे टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे मुंबईसह महत्त्वाच्या शहरांशी हवाई संपर्क पुन्हा प्रस्थापित होऊ लागला आहे.

**अबू धाबी-बंगळुरू उड्डाणालाही परवानगी**

याच पार्श्वभूमीवर अबू धाबीहून पहिले उड्डाण सोमवारी रात्री उशिरा केंपेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे उतरले. या प्रवाशांनी एतिहाद एरवेझने रद्द झालेल्या उड्डाणांनंतर हॉटेल व इतर सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## नागपुर स्फोटातील मृतांच्या कुटुंबाला प्रत्येकी ८२ लाखांची तर जखमींना २५ लाखांची मदत जाहीर

**एक्सप्लोसिव्ह मॅन्युफक्चरर कंपनीने ७५ लाखांची मदत**

काटोल तालुक्यातील एक्सप्लोसिव्ह दुर्घटनेत मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला भविष्यात सावरता यावे यासाठी शासकीय मदती व्यतिरिक्त एस.बी.एल. एक्सप्लोसिव्ह मॅन्युफक्चरर कंपनीने ७५ लाखांची रुपये तर जखमी झालेल्या व्यक्तीला २५ लक्ष रुपये देण्याचे आज कंपनीच्या वतीने मान्य करण्यात आले. राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्य शासनाचे मृत व्यक्तीस ५ लाख रुपये, केंद्र शासनाचे २ लाख असे मिळून सूमारे ८२ लक्ष रुपये प्रत्येकी मृत व्यक्तीच्या वारसांच्या नावे बँकेमध्ये ठेव स्वरुपात जमा केले जातील. त्यांच्या कुटुंबातील प्रमुख व्यक्तीला व्याज स्वरुपात हे पैसे घेता येतील. मृत व्यक्तीचा पाल्य कायदेशिर सज्ञान झाल्यानंतर त्याला ही रक्कम घेता येईल, असा बैठकीत चर्चा करुन निर्णय घेण्यात आला.




**■वसई। प्रतिनिधी,**

नागपुरातील रइछ या स्फोटकं तयार करणा-या कंपनीतील भीषण स्फोटप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी एसबीएल एनर्जी कंपनीचे संचालक, प्रोजेक्ट मॅनेजर, प्लांट मॅनेजर, सुपरवायझर, सेफ्टी ऑफिसरसह २१ वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. महत्त्वाचं म्हणजे पोलिसांनी याप्रकरणी रात्रीतून ९ जणांना अटक केली असून पोलिसांनी इतर आरोपींचा शोध सुरु आहे. नागपुरातील रइछ कंपनीती भीषण स्फोट झाला होता. या स्फोटात १९ कामगारांचा मृत्यू झाला होता. तर काही कामगार जखमी झाले होते.जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. १ मार्च रोजी सकाळी ६.३० च्या सुमारास ही भीषण दुर्घटना घडली होती. नागपुर स्फोटातील मृतांच्या कुटुंबाला प्रत्येकी ८२ लाखांची तर जखमींना २५ लाखांची मदत जाहीर झाली आहे.

**कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठित**

या अपघाताच्या अनुषंगाने केंद्र शासनांतर्गत कार्यरत असलेला पेसो विभाग, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग, कामगार आयुक्तालय यांच्या कार्यपध्दतीला अधिक तत्पर व जबाबदार करण्यासाठी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्तीचा निर्णय या बैठकीत सवार्नुमते घेण्यात आला. यात जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर व जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांचा समावेश आहे. आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी या केंद्रशासनाशी समन्वय साधून सदर शिफारशी करतील.

**शासनाच्या इज ऑफ डुईंग धोरणाचा कोणी गैरवापर करत असल्यास कारवाई होणार?**

भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायद्यामध्ये जर काही त्रुटी असतील तर त्यात दुरुस्ती करणे, कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कंपन्यांना व कामगारांशी संबंधित असलेल्या विभाग प्रमुखांना अधिक जबाबदार करणे, शासनाच्या इज ऑफ डुईंग धोरणाचा कोणी गैरवापर करत असेल तर त्यांच्याविरुध्द तत्काळ कारवाई करणे, कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षितता आदीबाबत ही समिती अभ्यास करुन आपल्या शिफारशी शासनाला सादर करेल. यावर राज्य शासन केंद्र शासनाशी समन्वय साधून तत्काळ निर्णय घेईल, असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**औद्योगिक सुरक्षा मानकांप्रमाणे पुर्तता होईपर्यंत कामगारांचे पगार चालू ठेवण्याचे आदेश**

या स्फोटाची चौकशी होईपर्यंत कंपनीला सिल ठोकण्यात आले आहे. सर्व बाबींचा निष्कर्ष निघेपर्यंत या कंपनीतील कामगार उपाशी राहू नयेत याची काळजी कंपनीने घेतली पाहिजे. सर्व प्रक्रिया पार पडेपर्यंत कंपनीतर्फे कामगारांना किमान वेतन देण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. याचबरोबर कंपनीत काम करणाऱ्या सर्व कामगारांना औद्योगिक सुरक्षा मानकांप्रमाणे किमान तीन महिन्यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. राज्य शासनातर्फे कंपनीच्या पडताळणीमध्ये आढळलेल्या त्रुट्या कंपनीने दुरुस्त केल्यानंतर जिल्हाधिकारी स्वतः याची पडताळणी करुन नंतरच कंपनीला परवानगीबाबत विचार करतील, असे पालकमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

काटोल तालुक्यातील राऊळगाव येथे काल झालेल्या दूर्घटनेबाबत आज पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित उच्चस्तरीय बैठकीस वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार समीर मेघे, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, माजी मंत्री अनिल देशमुख, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.राज गजभिये, महाराष्ट्र राज्य बारुद कामगार संघटनेचे स्वप्नील वानखेडे, एस.बी.एल. एक्सप्लोसिव्ह मॅन्युफक्चरर कंपनीचे प्रमुख, कामगार विभाग, औद्योगिक सुरक्षा व संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**कामगार विभागाच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना या प्रकरणात सहआरोपी करण्याचे निर्देश**

आजवर विविध एक्सप्लोसिव्ह कारखान्यांमध्ये गेलेले बळी हे अत्यंत दुःखद आहेत. शासन स्वस्थ बसणार नाही. जे दोषी आहेत त्यांच्याविरुध्द कोणत्याही परिस्थितीत कठोर कारवाई केली जाईल. या एक्सप्लोसिव्ह कंपनीला परवाना देण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्या पेसोचे संबंधित वरिष्ठ अधिकारी, कामगाराच्या हिताच्या दृष्टीने नियमांचे पालन होते किंवा नाही ही पडताळण्याची जबाबदारी असलेला औद्योगिक सुरक्षा विभाग आणि कामगारांच्या हक्कासाठी असलेल्या कामगार विभागाच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना या प्रकरणात सहआरोपी करण्याचे निर्देश त्यांनी बैठकीत दिले.

**बैठकीत कामगारांच्या सुरक्षेबाबत चर्चा**

या बैठकीत आढावा घेतांना सद्यस्थितीत असलेले कायदे, केंद्र आणि राज्य सरकार अंतर्गत असलेल्या कार्यालयांतील विसंगती, अनेक वर्षांपासून हाच कायदा अमलात असल्याने बदलत्या परिस्थितीनुसार यात अंतर्भूत कराव्या लागणाऱ्या इतर बाबींचा समावेश याकडे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लक्ष वेधले. कामगार कायद्याप्रमाणे कामगारांना सुरक्षिततेचे सर्व साहित्य व प्रशिक्षण दिलेले होते का ?एक्सप्लोसिव्ह कंपन्यांसाठी शासनाच्या सुरक्षा विषयक मानकांची त्या ठिकाणी उपलब्धता होती का ? याबाबत पेसो कार्यालयातर्फे केलेल्या पडताळणीमध्ये किती त्रुटींची पूर्तता कंपनीतर्फे करण्यात आली आदी प्रश्न या बैठकीत विविध मान्यवरांनी उपस्थित केले.

## राज्यात उष्णतेचा पारा वाढला, 'हा' जिल्हा अधिक तापणार

### हवामान विभागाचा महत्त्वाचा अलर्ट

**■पालघर। प्रतिनिधी,**

राज्यात उष्णतेचा पारा वाढलेला असून त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. ३ मार्च रोजी धुलिवंदनाच्या रोजी हवामान हे उष्ण आणि कोरडे



राहण्याची शक्यता आहे. राज्यातील तापमानात ३ ते ४ अंशांनी तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. अशातच जाणून घेऊयात ३ मार्च रोजी राज्यातील एकूण हवामानाचा अंदाज.

- **कोकण :** कोकण विभागातील मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गात हवामान उष्ण आणि दमट राहील. तसेच हवेची आर्द्रता अधिक असल्याने उकाडा तीव्र जाणवण्याची शक्यता आहे.
- **पश्चिम महाराष्ट्र :** पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली कोल्हापूरमध्ये उष्ण आणि कोरडे हवामान राहील असा अंदाज आहे. तसेच पुण्यात देखील अशीच स्थिती आहे.
- **मराठवाडा :** विभागातील छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, नांदेड, परभणी आणि धाराशिवमध्ये उष्ण आणि कोरड्या हवामानाचा अंदाज राहील. कमाल तापमान हे 33-36 अंश, तर किमान तापमान हे 19-22 अंश राहण्याची अधिक शक्यता आहे.
- **विदर्भ :** या विभागातील अमरावती, नागपूर, अकोला, वाशिम यवतमाळ,चंद्रपूर, गडचिरोली आणि बुलढाण्यात सर्वाधिक उष्णता जाणवेल.

## पालघरमध्ये भागेरिया केमिकल कारखान्यात विषारी वायू गळती

### प्रशासन सतर्क, नागरिकांना खबरदारीचा इशारा

**■पालघर। प्रतिनिधी,**

पालघर जिल्ह्यातील तारापूर एमआयडीसी परिसरात सोमवारी (दि.२) पहाटे २ वाजण्याच्या सुमारास भागेरिया इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीतून सल्फर ट्रायऑक्साइड वायूगळती झाल्याचा संशय व्यक्त होताच परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच बोईसर एमआयडीसी अग्निशमन दल, जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

प्राथमिक माहितीनुसार, कारखान्यातील साठवण टाकीतून ओलियम वायूची गळती झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. हा वायू वातावरणात पसरल्यामुळे काही भागात पांढऱ्या धुरासारखा किंवा धुक्यासारखा दिसू शकतो.

**प्रशासनाचे आवाहन; नागरिकांनी घाबरू नये**

जिल्हा पोलिस अधीक्षक यतीश देशमुख यांनी नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे. "गळतीचा स्त्रोत नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दल, प्रशासन आणि पोलीस पथके कार्यरत आहेत. परिस्थिती




**नागरिकांसाठी सूचना जाहीर**

- घराचे दरवाजे आणि खिडक्या बंद ठेवाव्यात.
- पंखे, एसी आणि इतर वायुविजन यंत्रणा तात्पुरत्या बंद कराव्यात.
- अत्यावश्यक असल्यासच घराबाहेर पडावे.
- बाहेर पडताना नाक व तोंड ओल्या कापडाने झाकावे.
- लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असलेल्या व्यक्तींची विशेष काळजी घ्यावी.
- शक्य असल्यास वाऱ्याच्या उलट दिशेने स्थलांतर करावे.

नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये," असे त्यांनी स्पष्ट केले.

**खबरदारी म्हणून स्थलांतर**

माहितीनुसार, सुरक्षेच्या दृष्टीने परिसरातील काही रहिवासी भाग आणि शाळा तात्पुरते रिकामे करण्यात आले आहेत. तसेच जवळील औद्योगिक कंपन्यांना कामकाज बंद ठेवून कर्मचाऱ्यांना सुरक्षित स्थळी हलवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**हवेची गुणवत्ता तपासणी सुरू**

आपत्कालीन पथके परिसरातील हवेची गुणवत्ता तपासत असून आसपासच्या भागांवर होणाऱ्या संभाव्य परिणामाचा आढावा घेत आहेत. गळतीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तपास सुरू असून प्रशासनाकडून पुढील अद्ययावत माहितीसाठी प्रतीक्षा आहे.

दरम्यान, नागरिकांनी शांतता राखून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुण्यात विषारी धूर पसरला, ५ विद्यार्थी रुग्णालयात

### २० हजार विद्यार्थ्यांच्या कॉलेजला सुट्टी




**■पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यात लोणी काळभोर परिसरात मुळा-मुठा नदीपात्रात निमयित मोठ्या प्रमाणात कचरा टाकून तो जाळला जात आहे. या कचऱ्यामुळे विषारी धूर पसरला आणि पाच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. या विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास झाल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून नदीपात्राजवळ असलेल्या एका कंपनीने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना एक दिवसाची विशेष सुट्टी जाहीर केली. तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी एमआयटी शैक्षणिक संकुलाने संकुलात शिकणाऱ्या २० हजार विद्यार्थ्यांना एक दिवसाची विशेष सुट्टी दिली.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अग्निशमन दलाने नदीपात्रातील कचऱ्याला लावलेली आग नियंत्रणात आणली. नदीपात्रातल्या कचऱ्यात नेमके कोणते घटक होते हे जाणून घेण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने तपास सुरू आहे. नदीपात्रातील पाण्याचे आणि कचऱ्याचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी प्रशासनाने विशेष व्यवस्था करावी अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

नदीपात्रात कचरा सतत टाकला जात असल्याने आग वारंवार भडकत असल्याचे मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी सांगितले. या प्रकरणी तपासातून अधिक माहिती हाती येईल, असेही ते म्हणाले.

## पुण्यात महिलेची गर्भाशयाची गाठ काढण्याऐवजी डॉक्टरांनी...

**नेमकं घडलं काय?**

तक्रारदार महिलेच्या गर्भाशयात छोटी गाठ असल्याचे २०२३ मध्ये सोनोग्राफी अहवालात समोर आले होते. उपचारासाठी त्या १३ सप्टेंबर २०२५ रोजी मांजरीतील साई केअर हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्या. डॉक्टरांनी त्यांना लेझर शस्त्रक्रियेद्वारे केवळ गाठ काढावी लागेल, असे आश्वासन दिले होते. १५ सप्टेंबर रोजी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आणि १७ सप्टेंबरला त्यांना घरी सोडण्यात आले.

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील मांजरी परिसरातील एका खासगी रुग्णालयातून वैद्यकीय क्षेत्राला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. गर्भाशयातील साधी गाठ काढण्यासाठी शस्त्रक्रिया करायला गेलेल्या एका ३५ वर्षीय महिलेचे डॉक्टरांनी तिची कोणतीही संमती नसताना थेट गर्भाशयच काढून टाकले. याप्रकरणी मांजरी पोलिसांनी साई केअर हॉस्पिटलमधील चार डॉक्टरांसह पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

**तपासणीत धक्कादायक सत्य समोर**

शस्त्रक्रियेनंतर काही दिवसांनी महिलेला शारीरिक त्रास जाणवू लागला. त्या पुन्हा रुग्णालयात तपासणीसाठी गेल्या असता, डॉक्टरांनी गाठ काढण्याऐवजी संपूर्ण गर्भाशयच काढून टाकल्याचे समोर आले. विशेष म्हणजे, शस्त्रक्रियेपूर्वी महिलेने केवळ गाठ काढण्याची परवानगी दिली होती, गर्भाशय काढण्याबाबत कोणतीही संमती दिलेली नव्हती. याबाबत डॉक्टरांना जाब विचारला असता, त्यांनी कोणतीही समाधानकारक उत्तरे दिली नाहीत.

याप्रकरणी पीडितेने मांजरी पोलीस ठाण्यात पोलिसांनी डॉ. संदीप कराड, डॉ. मंदार साहुजी, डॉ. निहाल शेख, डॉ. शेहजाद शेख आणि सूरज कांबळे यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १२५ (ब) आणि ३ (५) अन्वये निष्काळजीपणाचा ठपका ठेवत गुन्हा दाखल केला आहे.




## बॉयफ्रेंडने निर्जनस्थळी नेऊन अत्याचार करुन गेला, पीडितेच्या मदतीसाठी आलेल्या तरुणानेही अब्रू लुटली

**■बीड। प्रतिनिधी,**

ओडिशाच्या जगतसिंहपूर जिल्ह्यातून एक अंगावर काटा आणणारी घटना समोर आली आहे. एका २३ वर्षीय तरुणीवर एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी बलात्कार करण्यात आला आणि त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी तिला चार मजली इमारतीवरून खाली फेकून देण्यात आले. या हृदयद्रावक घटनेत तरुणीचा मृत्यू झाला असून, पोलिसांनी याप्रकरणी तिचा प्रियकर आणि एका अन्य नराधमाला अटक केली आहे. ही घटना २२ फेब्रुवारी रोजी घडली असून, आरोपींविरुद्ध



अपहरण, बलात्कार आणि हत्येसह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

२२ फेब्रुवारीच्या सकाळी ही तरुणी आपल्या घरातून प्रियकर सोमनाथ ओझा याच्यासोबत लग्न करण्याच्या उद्देशाने बाहेर पडली होती. सोमनाथने तिला लग्नाचे आमिष दाखवून जगतसिंहपूर येथील सरला मंदिरात बोलावले होते. मात्र, तिथे पोहोचल्यानंतर त्याने लग्नाऐवजी तिला एका निर्जन स्थळी नेले. तिथे तिच्यावर अत्याचार केल्यानंतर आरोपी सोमनाथने तिला रहमा बसस्थानकावर असहाय्य अवस्थेत सोडून तिथून पळ काढला. प्रियकरानेच घात केल्यामुळे पीडिता तासनतास बसस्थानकावर गोंधळलेल्या आणि रडत असलेल्या स्थितीत उभी होती.

तरुणीला एकटे पाहून शुभम कुमार सिंह नावाचा दुचाकीस्वार तिथे आला आणि त्याने मदतीचा बहाणा केला. सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्याचे आश्वासन देऊन त्याने तरुणीला आपल्या दुचाकीवर बसवले आणि पारादीप येथील आपल्या भाड्याच्या खोलीवर नेले. पोलीस अधीक्षक अंकित कुमार वर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुभमने तरुणीला इमारतीच्या छतावर नेऊन तिच्यावर पुन्हा बलात्कार केला. आपला गुन्हा उघड होऊ नये या भीतीने त्याने पीडितेचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर तिला चार मजली इमारतीवरून खाली ढकलून दिले, ज्यात तिचा जागीच मृत्यू झाला.

दुसरीकडे, तरुणी घरी न परतल्याने तिच्या भावाने २३ फेब्रुवारी रोजी तिरतोल पोलीस ठाण्यात ती बेपत्ता असल्याची तक्रार दिली होती. त्याच दिवशी तिचा मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. मात्र, तपासादरम्यान सत्य समोर आल्यानंतर २५ फेब्रुवारी रोजी भावाने पारादीप मॉडेल पोलीस ठाण्यात बलात्कार आणि हत्येची लेखी तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या असून त्यांची दुचाकी आणि मोबाईल फोन जप्त केले आहेत.

या घटनेमुळे संपूर्ण ओडिशात संतापाची लाट असून स्थानिक नागरिकांनी आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी शवविच्छेदन अहवाल आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास पूर्ण केला असून, दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## तिसऱ्या महायुद्धाला प्रारंभ?



अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणवर केलेल्या आक्रमणाला प्रत्युत्तर म्हणून इराणने ६ देशांतील अमेरिकेच्या सैन्य तळांवर आक्रमण केले. इराणने यासह शहरी भागांवरही केलेली आक्रमणे पहाता 'तिसऱ्या महायुद्धाला प्रारंभ झाला आहे का?', असा प्रश्न जगातील प्रत्येक व्यक्तीच्या मनात उपस्थित झाला आहे. याचे उत्तर मिळण्यासाठी कदाचित काही दिवस वाट पहावी लागणार आहे; कारण इराणवरील आक्रमणाचा अमेरिका आणि इस्रायल यांचा हेतू वेगळा आहे अन् इराणने त्याला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून पुढे या आक्रमण झालेल्या अन्य देशांकडून अमेरिकेवर दबाव आणला जातो कि इराणच्या विरोधात काही केले जाते का? आणि पुढे इराणला कुणी साहाय्यासाठी धावून येत आहे का? यावरून तिसरे महायुद्ध होईल कि नाही?, हे स्पष्ट होऊ शकते. सध्या तरी हे आक्रमण इराणपुरतेच मर्यादित आहे. इराण जगातील तिसरा तेल उत्पादक देश आहे. जगात तो एकमेव शियाबहुल देश आहे. अन्य इस्लामी देश हे सुन्नीबहुल आहेत. शिया आणि सुन्नी यांच्यात अनेक शतकांपासूनचे वैर आहे. यामुळे कोणत्याही सुन्नी देशाने कधीही इराणचे उघड समर्थन केले किंवा त्याला साहाय्य केले, असे दिसून आले नाही. मुसलमानांचा प्रमुख देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सौदी अरेबियाकडूनही कधी इराणला साहाय्य झाले नाही. आताही सौदी अरेबियानेच ट्रम्प यांना इराणवर आक्रमण करण्यासाठी सातत्याने दूरभाष करून चिथावल्याचे म्हटले जात आहे. यातून इस्लामी देशांची खरी मानसिकता लक्षात येते. इराणकडील तेलाच्या साठ्यांवर अमेरिकेचा डोळा आहे, तर इस्रायलला 'इराणने अणूबाँब बनवू नये', अशी अपेक्षा आहे. 'जर इराणने अणूबाँब बनवले, तर त्याचा वापर इस्रायलच्याच विरोधात होणार', हे स्पष्ट असल्याने इस्रायल इराणच्या विरोधात आहे. त्याला अमेरिकेने साथ देऊन इराणवर अणूबाँब बनवू नये, यासाठी गेले काही महिने दबाव आणला जात होता. त्याला इराणने दाद दिली नाही. मागील जून मासात अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणच्या अणूप्रकल्पावर आक्रमण करून ते नष्ट करण्याचा प्रयत्न केला; पण तो अयशस्वी झाला. हा प्रयत्न अपयशी ठरल्यावर अमेरिकेने इराणमध्ये खामेनी यांच्या विरोधात असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि तो बऱ्यापैकी यशस्वी ठरला. जोपर्यंत खामेनी यांच्या इस्लामी सत्तेचे इराणवर नियंत्रण आहे, तोपर्यंत अणूप्रकल्प थांबणार नाही आणि तेथील तेलसाठ्यावर अमेरिकेचे नियंत्रण येणार नाही. यामुळेच खामेनी यांना हटवण्याचा प्रयत्न चालू करण्यात आला. त्यासाठी प्रथम असंतोष निर्माण केला गेला आणि आता खामेनी यांना ठार करण्यात आले. इराण त्याला प्रत्युत्तर देत असला, तरी तो आणखी २-३ दिवस टिकेल, असे तज्ञांचे म्हणणे आहे. अमेरिका आणि इस्रायल यांच्या शक्तीपुढे इराण टिकणार नाही. याचे प्रमुख कारण, म्हणजे इराणकडे हवाई दल नाही. लढाऊ विमाने नाहीत. हवाई संरक्षण यंत्रणा नाही. त्याच्याकडे केवळ क्षेपणास्त्रे आहेत. त्यांचा साठा संपल्यावर इराण शक्तीहीन होणार, हे उघड आहे. त्याला उघडपणे साहाय्य करण्यासाठी कुणी पुढे आले आहे, असेही नाही. त्यामुळे त्याचा पराभव उघड आहे. जूनमधील आक्रमणाच्या वेळीही त्याने काही क्षेपणास्त्रे डागल्यानंतर माघार घेतली होती, हे विसरता येत नाही. इराणने पराजय मान्य केल्यानंतर स्थानिक जनता सत्तापालट करून लोकशाही व्यवस्था निर्माण करण्यासाठी अमेरिकेच्या अंतर्गत आदेशाने आंदोलन चालू करील आणि मग तेथे एकतर राजेशाही जी खोमेनी यांच्या वर्ष १९७९ मधील इस्लामी क्रांतीच्या पूर्वी होती, ती लागू करण्यात येईल किंवा लोकशाही व्यवस्था निर्माण केली जाईल. दोन्हीपैकी काहीही झाले, तरी ते अमेरिकेचे बटीक रहातील आणि अमेरिका सांगेल, तसे केले जाईल, हे उघड आहे. यासाठीच सध्याची आक्रमणे चालू असून त्याला मिळालेले हे अंतिम यश असेल. काही आठवड्यांपूर्वी अमेरिकेने त्याच्या शेजारी असलेला बेटांचा देश व्हेनेझुएलावर अमली पदार्थांची तस्करी केल्याचा आरोप करून आक्रमण केले आणि त्याचे प्रमुख मादुरो अन् त्याची पत्नी यांना पकडून अमेरिकेत आणले आणि खटला चालू केला. त्यानंतर व्हेनेझुएलाच्या तेलाच्या साठ्यावर नियंत्रण मिळवले. ही शुद्ध दादागिरी होती. या दादागिरीचा शाब्दिक विरोध करण्यापलीकडे कोणत्याच देशाने अमेरिकेचा केस वाकडा केला नाही. तीच स्थिती इराणवरील आक्रमणानंतर दिसून येत आहे. कुणीही शाब्दिक निषेधापलीकडे काही करणार असल्याचे सांगत नाही. युरोपीय देशांनीही निषेध केला, तरी ते अमेरिकेवर दबाव आणू शकत नाहीत. रशिया आणि चीन यांनी हीच भूमिका घेतलेली आहे. यातून हे स्पष्ट आहे की, तुघलकी मानसिकतेच्या ट्रम्प यांनी संपूर्ण जगाला वेठीस धरलेले आहे आणि ते त्यांना हवे तसे करत आहेत. कुणी त्यांना विरोध करू शकत नाही, ही वस्तूस्थिती आहे. ट्रम्प यांना जगाच्या तेल साठ्यांवर नियंत्रण मिळवायचे आहे, हे लक्षात येते. रशियाकडेही मोठा तेल साठा आहे. युक्रेन युद्धानंतर अमेरिकेने रशियावर अनेक निर्बंध घातल्याने त्याच्याकडून भारत आणि चीन वगळता कुणीही तेल खरेदी करत नाही. चीनवर दबाव आणणे शक्य नसल्याने ट्रम्प भारतावर दादागिरी करून तेल खरेदी थांबवण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहेत. भारतानेही त्याला भीक घातलेली नसल्याने आयात शुल्क वाढवून दबाव आणण्याचा केलेला ट्रम्प यांचा प्रयत्नही अपयशी ठरला आणि आता अमेरिकेच्याच सर्वोच्च न्यायालयाने त्यांना झटका देत वाढवलेले आयात शुल्क अवैध ठरवले. तरीही ट्रम्प यांचे शेपूट सरळ झालेले नाही. असे असले, तरी भारत रशियाकडून तेल खरेदी करत रहाणारच आहे. ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करावे, यासाठी भारतावर दबाव आणलेला आहे आणि तो भारताने मान्य केलेला नाही. एकूण सर्वकाही अट्टहास तेलासाठी चालू आहे, हेच वास्तव आहे. आताचे युद्ध २-३ दिवसांत थांबेल, असेच चित्र असल्याने जगावर विशेष परिणाम होण्याची शक्यता अल्प आहे. तेलाची किंमत वाढल्याने महागाई वाढण्याची शक्यता त्यामुळे अल्प होते. जर अन्य देश इराणच्या साहाय्याला धावून आले आणि युद्धाचे स्वरूप व्यापक झाले, तरच तिसरे महायुद्ध अन् मग त्याचे सर्व परिणाम जगावर होतील, अशी सध्या तरी स्थिती नाही. यातून एकमात्र निश्चित की, आता जगाची राजकीय स्थिती अनपेक्षित अशी झाली आहे. जगात कधी काय घडेल, हे सांगता येत नसल्याने येणाऱ्या आपत्काळाला सामोरे जाण्यासाठी प्रत्येकाने सतर्क रहाणे, आर्थिकदृष्ट्या सिद्धता करणे आणि त्यासह ईश्वरी अनुसंधानात रहाणेच आवश्यक आहे!

## ध्रुवीकरणाच्या राजकारणात हरवत चाललेले बंधुत्व



राजकीय टीका करणे, विरोधकांवर कठोर शब्दांत प्रहार करणे, हे लोकशाहीचे अंग आहे. परंतु एखाद्या समुदायाविषयी संशय निर्माण करणारी, ध्रुवीकरणाला खतपाणी घालणारी भाषा दीर्घकालीन दृष्टीने समाजासाठी घातक ठरते.

लोकशाहीत भाषणस्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार असला, तरी तो अमर्याद नाही. सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या व्यक्तींना विशेषतः राजकीय नेत्यांना, लोकप्रतिनिधींना आपल्या शब्दांची सामाजिक, कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी पेलावी लागते. अलीकडील काळात महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाच्या काही नेत्यांच्या वक्तव्यांमुळे राजकीय टीकेची मर्यादा नेमकी कुठे संपते आणि सामाजिक सलोख्याची जबाबदारी कुठे सुरू होते? हा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे आला आहे.

सत्ताधारी पक्षाने वादग्रस्त वक्तव्ये करून समाजात तेढ निर्माण करणारी, विरोधकांवर अत्यंत टोकाची व खालच्या पातळीवर जाऊन टीका करणाऱ्या उथळ नेत्यांची अख्खी फौज तयार केली आहे. राज्याच्या मंत्रिमंडळातील कॅबिनेट मंत्री नितेश राणे, आमदार गोपीचंद पडळकर, माजी खासदार व भाजप नेत्या नवनीत राणा, खासदार अनिल बोंडे, यांच्यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांनी गेल्या काही दिवसांत धार्मिक आणि ओळखाधिष्ठित मुद्द्यांवर घेतलेली तीव्र भूमिका आणि केलेली वादग्रस्त वक्तव्ये समाजात तेढ निर्माण करणारी आहेत. ही सर्व उदाहरणे एकत्र पाहिली, तर हा प्रश्न केवळ एखाद्या व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही; तो राजकीय संवादाच्या दर्जाशी संबंधित ठरतो.

### भाषणस्वातंत्र्य आणि घटनात्मक चौकट

भारतीय राज्यघटनेतील कलम १९(१)(अ) नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते. परंतु कलम १९(२) नुसार सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता, राष्ट्राची अखंडता आणि इतरांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासाठी वाजवी बंधनेही आहेत. राजकीय नेते, लोकप्रतिनिधींच्या वक्तव्यांना सामान्य नागरिकांच्या मतांपेक्षा अधिक वजन असते. कारण त्यांची वाणी ही केवळ वैयक्तिक मत नसते; ती त्यांच्या पक्षाची, त्यांच्या विचारसरणीची आणि अनेकदा सरकारची प्रतिमा तयार करते. त्यामुळे सार्वजनिक वक्तव्य करताना संवैधानिक जबाबदारीचे भान आवश्यक आहे. पण दुर्दैवाने गेल्या काही दिवसांत ते पाळले जात नाही. भाजपचे खासदार रमेश बिधुडी यांनी तर लोकशाहीचे पवित्र मंदिर असणाऱ्या लोकसभेत एका अल्पसंख्याक समाजातून आलेल्या खासदाराबाबत अत्यंत हीन पातळीवर जाऊन वक्तव्य केले. पण लोकसभा अध्यक्ष, पंतप्रधान, भाजप अध्यक्षांनी त्यांच्यावर काहीच कारवाई केली नाही. उलट बिधुडी यांच्याप्रमाणे वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्या अनेक नेत्यांना राज्यसभा, विधान परिषदेत पाठवून, मंत्रिपदे देऊन बक्षिसी दिल्याची अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत.

### सर्वसाधारण आरोप आणि सामाजिक परिणाम

एखाद्या व्यक्तीने कायदा मोडला, तर त्यावर कारवाई व्हावी, ही कायदेशीर बाब आहे. परंतु संपूर्ण धर्म, जात किंवा सामाजिक घटकावर संशयाची सावली टाकणारे सर्वसाधारण आरोप सामाजिकदृष्ट्या अत्यंत धोकादायक असतात. जेव्हा राजकीय भाषणात 'समूह' हा संशयाचा केंद्रबिंदू बनतो, तेव्हा संबंधित समुदायात असुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि बहुसंख्य समाजात त्यांच्याविषयी अविश्वासाची मानसिकता वाढते. महाराष्ट्रासारख्या राज्यात ही प्रक्रिया अधिक संवेदनशील ठरते. येथे विविध धर्म, भाषा आणि सामाजिक गट शतकानुशतके एकत्र नांदत आले आहेत. अशा पार्श्वभूमीवर उत्तेजक, विभाजन करणारी भाषा वापरणे म्हणजे सामाजिक समतोलाशी खेळ करण्यासारखे आहे.

### प्रबोधन परंपरा आणि आजची भाषा

महाराष्ट्राची सामाजिक परंपरा समतेच्या विचारांवर उभी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जाती-धर्मांच्या मावळ्यांना सोबत घेऊन रयतेचे राज्य निर्माण केले. त्या स्वराज्यात जात-धर्म-भाषा यावरून भेद केला जात नव्हता. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण आणि सामाजिक न्यायाचा संदेश दिला; राजर्षी शाहू महाराजांनी आरक्षणासारख्या प्रगत धोरणांद्वारे वंचित घटकांना संधी दिली; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बंधुतेचा सिद्धांत राज्यघटनेत अधोरेखित केला. बंधुता Fraternity हा शब्द केवळ तात्त्विक संकल्पना नाही; तो सामाजिक सहअस्तित्वाचा पाया आहे. जर राजकीय संवादातूनच बंधुतेचा धागा कमकुवत झाला, तर समाजात तणाव वाढण्याची शक्यता असते.

### ध्रुवीकरणाचे राजकारण : अल्पकालीन लाभ, दीर्घकालीन तोटा

राजकीयदृष्ट्या उत्तेजक विधानांचा तात्पुरता फायदा होऊ शकतो. ध्रुवीकरणामुळे विशिष्ट मतदारसंघात भावनिक एकजूट निर्माण होते. परंतु याचे दीर्घकालीन दुष्परिणाम समाजावर होतात. ध्रुवीकरणामुळे सामाजिक अविश्वास वाढतो. सार्वजनिक चर्चेची पातळी घसरते. विकास, शिक्षण, आरोग्य यांसारखे मूलभूत प्रश्न बाजूला पडतात. जेव्हा राजकीय अजेंडा ओळखाधिष्ठित संघर्षांवर केंद्रित होतो, तेव्हा लोकशाहीतील धोरणात्मक चर्चेला दुय्यम स्थान मिळते.

### पक्षीय जबाबदारी आणि मौनाची भूमिका

एखाद्या नेत्याने वादग्रस्त विधान केले, तर त्याबाबत संबंधित पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट असणे आवश्यक असते. सार्वजनिक निषेध, स्पष्टीकरण किंवा शिस्तभंगाची कारवाई यासारखी कोणतीही पावले उचलली नाहीत, तर पक्षाला ही वादग्रस्त विधाने मान्य आहेत, असा संदेश समाजात जातो. मौन हेही एक राजकीय विधान असते. त्यामुळे राजकीय पक्षांनी संवादासाठी अंतर्गत आचारसंहिता विकसित करणे आवश्यक आहे.

### माध्यमे, सोशल मीडिया आणि वाढती तीव्रता

आजच्या डिजिटल युगात प्रत्येक विधान काही सेकंदांत व्हायरल होते. टीआरपी आणि क्लिकबेटच्या स्पर्धेत वादग्रस्त विधानांचा प्रसार प्रचंड वेगाने होतो. परिणामी, त्याबाबत समतोल विश्लेषणाऐवजी उत्तेजक चर्चा होतात. माध्यमांनीही वादग्रस्त विधान, जीभ घसरली एवढे म्हणून अशा विधानांना प्रसिद्धी देऊन त्यावरील प्रतिक्रिया दाखवण्यासोबतच, त्या विधानांचे सामाजिक दुष्परिणाम काय होऊ शकतात हे जनतेला समजावून सांगण्याची आवश्यकता आहे. पण दुर्दैवाने तसे होत नाही. वादग्रस्त, जातीय, धार्मिक, तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करणाऱ्या नेत्यांना सातत्याने समाज माध्यमांतून आणि वृत्तवाहिन्यांवरून प्रसिद्धीचे बळ मिळत असल्याने ते अधिक तीव्रतेने वक्तव्ये करतात.

### कायदेशीर चौकट आणि संस्थांची भूमिका


लोकशाहीत संतुलन राखणे ही निवडणूक आयोग, न्यायालये आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणांची मूलभूत जबाबदारी आहे. आचारसंहितेची अंमलबजावणी, द्वेषपूर्ण प्रचारावर नियंत्रण आणि मूलभूत अधिकारांचे संरक्षण ही भारतीय निवडणूक आयोग व न्यायसंस्थेची घटनात्मक कर्तव्ये आहेत. या संस्था निष्पक्ष आणि पारदर्शक राहिल्या तरच लोकांचा विश्वास टिकतो. मात्र प्रत्येक वादग्रस्त वक्तव्य न्यायालयात नेणे हा कायमस्वरूपी उपाय ठरत नाही. न्यायालयीन प्रक्रिया ही घटना घडल्यानंतरची कारवाई असते; परंतु सामाजिक तणाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक भूमिका अधिक महत्त्वाची असते. पक्षांतर्गत शिस्त, नेतृत्वाकडून स्पष्ट संदेश आणि सार्वजनिक जबाबदारीची जाणीव ही अधिक प्रभावी साधने ठरतात. कायद्याचा उपयोग दडपशाहीसाठी नव्हे, तर सामाजिक सलोखा आणि सार्वजनिक विश्वास टिकवण्यासाठी व्हायला हवा. लोकशाहीची ताकद केवळ न्यायालयीन आदेशात नसून राजकीय संयम, संस्थांची निष्पक्षता आणि समाजाच्या परिपक्वतेत असते.

### मयार्दा ही कमकुवतपणा नव्हे

राजकीय टीका करणे, विरोधकांवर कठोर शब्दांत प्रहार करणे, हे लोकशाहीचे अंग आहे. परंतु एखाद्या समुदायाविषयी संशय निर्माण करणारी, ध्रुवीकरणाला खतपाणी घालणारी भाषा दीर्घकालीन दृष्टीने समाजासाठी घातक ठरते. आज महाराष्ट्रासमोर आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, कृषी, पर्यावरणीय अशी अनेक आव्हाने आहेत. अशा वेळी सार्वजनिक संवादाचा केंद्रबिंदू विकास आणि धोरणात्मक चर्चा असायला हवी. वाणीची मर्यादा पाळणे म्हणजे आत्मसंयम आणि आत्मसंयम ही प्रगल्भ लोकशाहीची खूण आहे. सामाजिक एकात्मता ही घोषणांनी नव्हे, तर जबाबदार शब्दांनी टिकते. राजकीय नेतृत्वाने हे भान ठेवले, तरच महाराष्ट्राची प्रबोधन परंपरा आणि सामाजिक सलोखा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहील.

## 'जल दिवाळखोरी'

सध्याचे युग हे माहिती-तंत्रज्ञानाचे असल्याचे आपण गेली अनेक दशके ऐकतो आहोत. अर्थात, त्याची प्रचितीदेखील आपल्याला पावलोपावली येते. मात्र आता जग ह्यजल दिवाळखोरीह्च्या युगात प्रवेश करत असल्याचा निष्कर्ष जानेवारी २०२६ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात काढण्यात आला आहे. जागतिक पातळीवरील येऊ घातलेले हे जलसंकट आता केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे नसून एक दीर्घकालीन वास्तव बनले असल्याचे या अहवालामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.



संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार आज जगातील चारपैकी तीन लोक अशा देशांत राहतात जिथे पाण्याची टंचाई, पाणीप्रदूषण किंवा दुष्काळ आहे. म्हणजेच जगातील सुमारे ७५ टक्के लोकसंख्या जल-असुरक्षित किंवा अत्यंत जल-असुरक्षित देशांत असून सुमारे ४ अब्ज लोकांना दरवर्षी किमान एका महिन्यासाठी तीव्र पाणीकपात सहन करावी लागत आहे. गेली अनेक दशके सुरू असलेला अमर्याद जलउपसा आणि तलाव, हिमनद्या व भूजलसाठ्यांचे झालेले अपरिवर्तनीय नुकसान यामागे कारणीभूत आहे.

शतकानुशतके आपण पाण्यासाठी निसर्गावर आणि नैसर्गिक प्रक्रियांवर अवलंबून होतो. पण, दरवर्षी पडणाऱ्या पावसामुळे आणि अतिथंड प्रदेशांतील बर्फ वितळल्यामुळे उपलब्ध होणाऱ्या पाण्यापेक्षा अधिक पाणी जगातील बहुतेक प्रदेशांमध्ये वापरले जात आहे. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी थेट समुद्रात मिसळून जात आहे. सहाजिकच, पाण्याची गरज भागविण्यासाठी भूमिगत जलसाठ्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. आजमितीला जगातल्या मोठ्या भूजलसाठ्यांपैकी ७० टक्के भूजलसाठ्यांची स्थिती गंभीर बनत चालली आहे. अधिक चिंतेची बाब म्हणजे हे बदल अनेक ठिकाणी कायमस्वरूपी घडून येत असून भविष्यात या जलसाठ्यांचे पुनर्जीवन होण्याची शक्यता नाही. कारण हे जलसाठे भरून यायला हजारो वर्षे लागू शकतात. थोडक्यात, आपल्या पुर्वजांकडून प्राप्त झालेला जलसाठा आता झपाट्याने संपत चालला असून जगावर जल दिवाळखोरीचे संकट येण्याची चाहूल लागली आहे.

तुर्कस्तानमध्ये अतिप्रमाणात भूजल उपसल्यामुळे भूभागामध्ये पोकळ्या निर्माण होऊन सुमारे ७०० ठिकाणी भूभाग खचून मोठमोठी भगदाडे पडली आहेत, तर चीनमधील बीजिंग परिसरात वाळवंटीकरणामुळे उठलेल्या धुळीच्या वादळांत शेकडो लोकांचा मृत्यू झाला आहे.

श्रीमंत आणि प्रगत देशही या संकटापासून वाचलेले नाहीत. अमेरिकेत पश्चिम भागाला पाणी पुरवठा करणाऱ्या कोलोरॅडो नदीचा प्रवाह गेल्या वीस वर्षांत सुमारे वीस टक्क्यांनी घटला आहे. यामागे कमी प्रमाणात होणारी पर्जन्यवृष्टी आणि पाण्याच्या बाष्पीभवनाचे वाढलेले प्रमाण ही प्रमुख कारणे आहेत. असे असले तरी या नदीचे पाणी गुरांसाठी लागणाऱ्या चाऱ्याच्या शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर वळवले जाते, त्याचप्रमाणे लॉस एंजेलिससारखी शहरे पिण्याच्या पाण्यासाठी याच नदीवर अवलंबून आहेत. त्यामुळे आज अनेक नद्यांप्रमाणे ही नदीही पाणी आटल्याने अनेकदा समुद्रापर्यंत पोहोचत नाही. कोलोरॅडो नदीवर असलेल्या दोन मोठ्या जलाशयांची क्षमता सध्या केवळ तीस टक्के आहे, आणि २०२७ पर्यंत ते 'डेड पूल' पातळीवर म्हणजे १० ते १५ टक्के क्षमतेपर्यंत घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर विविध राज्यांमध्ये पाणीवापर कमी करण्याबाबतची चर्चा गेल्या वर्षी निष्फळ ठरली आहे.

पाण्याची तीव्र टंचाई इतरही संकटांना आमंत्रण देते. पाण्याच्या तीव्र टंचाईने ग्रस्त झालेले लोक मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित होत आहेत. अनेक ठिकाणी सामाजिक अस्थिरता आणि संघर्ष वाढण्यामागचे मूळ पाणीप्रश्न हे आहे. इराणची परिस्थिती याचे ज्वलंत उदाहरण आहे. गेली पाच-सहा वर्षे इराणमध्ये सरासरीपेक्षा खूपच कमी पाऊस पडत असून त्यामुळे नद्या, धरणे आणि जलाशयांमध्ये येणारे पाणी मोठ्या प्रमाणात घटले आहे. २०२५ अखेरीस उपलब्ध झालेल्या सरकारी व स्वतंत्र आकडेवारीनुसार, देशातील अनेक मोठी धरणे जवळजवळ रिकामी झाली असून काही ठिकाणी साठा केवळ ५ ते १० टक्क्यांवर आला आहे. गेल्या अनेक दशकांतील चुकीचे जलधोरण, पाण्याचा अतिवापर, सातत्याने पडणारा दुष्काळ आणि हवामान बदल यांचा एकत्रित परिणाम म्हणून ही परिस्थिती उद्भवली आहे. या परिस्थितीचा थेट फटका राजधानी तेहरानसारख्या मोठ्या शहरांना बसत आहे.

शहरांना पाणीपुरवठा करणारी व्यवस्था कोलमडण्याच्या उंबरठ्यावर असून नागरिकांना वापर कमी करण्याचे आणि पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ही परिस्थिती इतकी गंभीर बनत चालली आहे की सरकारने तेहरान शहर रिकामे करण्याचाही विचार केला आहे. भूजलाचा अतिरेकाने उपसा झाल्यामुळे पारंपरिक 'कनात' (भूगर्भ जलवाहिन्या) कोरड्या पडत आहेत, कधीकाळी मध्य पूर्वेतील सर्वात मोठे गणले जाणारे उर्मिया सरोवर आता जवळजवळ नष्ट झाले आहे, आणि तेहरानसह अनेक भागांत जमिन धसू लागली आहे.

इराणमध्ये जलसंकट ही केवळ पर्यावरणीय समस्या राहिली नसून, ते आता राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अस्थिरतेचे केंद्रबिंदू बनले आहे. २०२५ दरम्यान पाण्याच्या टंचाईसोबत महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक दबाव वाढल्याने देशातील अनेक भागांत मोठ्या प्रमाणावर आंदोलने आणि निदर्शने झाली. ही आंदोलने प्रामुख्याने शेतकरी, स्थानिक समुदाय आणि ग्रामीण भागातील लोकांनी पुढाकार घेऊन केली होती.

इराणमधील ही परिस्थिती बदलत्या जागतिक प्रवाहाचे प्रतिनिधित्व करते. एका स्वतंत्र अभ्यासांनुसार २०२२ नंतर पाण्याशी संबंधित हिंसक घटना जवळजवळ दुप्पट झाल्या आहेत. हवामानातील टोकाचे बदल, आंतरराष्ट्रीय नद्यांवरील वाद आणि असमान पाणीवाटप यामुळे हे तणाव अधिक तीव्र होत आहेत. परस्पर सहकार्याऐवजी पाण्यासाठी दोन देशांमध्ये स्पर्धा आणि तणाव वाढत गेल्यास भविष्यात हे संघर्ष अधिक भडकण्याची भीती तज्ञ व्यक्त करत आहेत.

ही समस्या केवळ कोरड्या प्रदेशांपुरती मर्यादित नाही. ज्या देशांत मुबलक पाऊस पडतो, ते देशही जलसंकटापासून सुरक्षित नाहीत. यामागचे प्रमुख कारण म्हणजे प्रचंड प्रमाणातील जलप्रदूषण. शहरी भागांतून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यापैकी दोन-तृतीयांशाहून अधिक पाणी कोणतीही प्रक्रिया न करता नद्या, तलाव आणि जलाशयांत सोडले जाते. यामुळे पाण्याची उपलब्धता आणखी कमी होते आणि परिसंस्थांचे गंभीर नुकसान होते. बांगलादेशमध्ये समुद्राची पातळी वाढल्यामुळे विहिरींमधील पाणी क्षारयुक्त झाले आहे. राजधानी ढाकामधील नद्या कारखान्यांमधील रसायनिक पदार्थयुक्त पाणी मिसळल्यामुळे अक्षरशः मृत झाल्या आहेत.

भारताच्या संदर्भात विचार केल्यास पाण्याची टंचाई, त्यामुळे होणारा अनिश्चित पाणीपुरवठा आणि जलप्रदूषणाचा सामना आज लाखो भारतीय करत आहेत. दरडोई वार्षिक जलउपलब्धता सातत्याने कमी होत असल्यामुळे भारत आता 'जलतणावग्रस्त' देशांच्या गटात गेला असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात म्हटले आहे. मोठ्या सुधारणा न झाल्यास येत्या काही दशकांत देशाच्या अनेक भागांत तीव्र पाणीकपात निर्माण होण्याची शक्यता देखील व्यक्त करण्यात आली आहे. २०२५ मध्ये काही भागांत चांगला पाऊस झाल्यामुळे देशातील भूजल पुनर्भरणात थोडीशी वाढ नोंदवली गेली असली, तरी पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेशचा पश्चिमेकडील भाग, गुजरात, कर्नाटक, तमिळनाडू आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये अतिवापरामुळे भूजलसाठ्यांमध्ये पुरेसे पाणी नाही. पावसाचे प्रमाण वाढले तरी असमान वितरण, हवामानातील अनिश्चितता आणि वाढती मागणी यामुळे जलसंकट कायम आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार मानवाला आता कमी पाण्यात जगायला शिकावे लागणार आहे. योग्य व्यवस्थापन केल्यास ते शक्य आहे. त्यासाठी सर्व देशांनी आपआपल्या जलस्रोतांची आणि पाणी वापराची काटेकोर नोंद ठेवायला सुरुवात करणे आवश्यक आहे. जलसंवर्धन, सक्षम व्यवस्थापन आणि न्याय्य पाणीवाटप यांवर वेळीच अंमलबजावणी झाली नाही, तर मात्र जल दिवाळखोरी अटळ आहे.

## युद्धाचा आगडोंब

वर्तमानातील घटना प्रथमच घडत असली, तरी पूर्वी तिचा अनुभव आल्यासारखे वाटण्याला 'देजा हू' असे म्हटले जाते. अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणवर केलेले हल्ले हे एक प्रकारे 'देजा हू'चा प्रत्यय देणारेच आहेत. इराणचा अणुकार्यक्रम धोकादायक ठरवून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे गेल्या काही दिवसांपासून त्या देशाला धमकावत होते; इस्रायलने हल्ला केल्यास आपण त्याच्या मागे उभे राहू, असेही सांगत होते. कोसळलेली अर्थव्यवस्था, महागाईने पिचलेली जनता आणि रस्त्यावर उतरलेले आंदोलक यांमुळे आधीच जेरीला आलेल्या इराणमध्ये सत्तांतर घडवून आणण्याचे सूचनही ट्रम्प करीत होते. इराणवर हल्ला होण्याला अशी नेपथ्यरचना झाली होती. शुक्रवारी हल्ले झाले. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांच्यासह वरिष्ठ नेते मारले गेले. प्रत्युत्तरादाखल इराणने पश्चिम आशियातील अमेरिकी तळांना लक्ष्य केले आणि पूर्ण युद्ध सुरू झाले आहे. अमेरिकेचे असे हल्ले काही नवीन नाहीत; यापूर्वी २००३मध्ये इराककडे घातक जैविक आणि रासायनिक अस्त्रे आहेत, असा दावा करून अमेरिकेने हल्ला केला होता. आपल्याला अनुकूल अशी राजवट प्रस्थापित करण्यासाठी, तेथील नैसर्गिक साधनसंपत्तीवरील हक्क अबाधित ठेवण्यासाठी आणि मुख्य म्हणजे आपल्या आर्थिक वर्चस्वाला धक्का बसू न देण्यासाठी अमेरिका असे हल्ले करीत आली आहे. त्यामुळे इराणवरील अमेरिकेचा हल्ला हा त्याच्या आजवरच्या वर्चस्ववादी आणि एकाधिकारवादी धोरणाला साजेसा असाच आहे. बेताल वक्तव्ये आणि धटिंगणपणा यामुळे ट्रम्प यांच्या काळात अमेरिका अधिक आक्रमक झाल्याचा भास होऊ शकतो; परंतु प्रत्यक्षात त्यांच्या पूर्वसुरींची कृती फार वेगळी नव्हती. इराणचा अणुकार्यक्रम अमेरिका आणि इस्रायल या दोघांनीही खुपणे स्वाभाविक; सध्याच्या हल्ल्यांमागे केवळ त्याचे कारण नाही. वास्तविक जीनिव्हा येथे अमेरिका आणि इराण यांच्यात आण्विक कराराबाबत चर्चा सुरू होती; ती काही प्रमाणात सकारात्मक असल्याचाही दावा केला जात होता. असे असताना अमेरिकेने इराणवर हल्ले केले. त्यामुळे अणुकार्यक्रम हे निमित्त असल्याचे स्पष्ट होते. अमेरिकेचा खरा हेतू इराणमधील राजवट बदलण्याचा आहे. इस्लामी क्रांतीनंतर इराणमध्ये सुरू असलेली राजवट अमेरिकेला शत्रू मानणारी होती. आण्विक क्षमता विकसित करीत इराण पश्चिम आशियात आपली ताकदही निर्माण करू पाहत होता. शिवाय काही बंडखोर गटांच्या मागे राहून इस्रायललाही आव्हान देऊ पाहत होता. सर्वोच्च नेते खामेनी यांची इराणी जनतेतील लोकप्रियता कमी झाली होती आणि तेथील धार्मिक एकारलेपणाला लोक वैतागलेले होते हे खरे; त्यामुळेच गेल्या काही महिन्यांपासून तिथे लोक रस्त्यावर उतरले होते. त्यांच्या या उठावाचे रूपांतर क्रांतीत करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न होता. स्थानिक लोक सत्ताधीशांच्या विरोधात आहे, असा दावा करून व्हेनेझुएलात ट्रम्प यांनी केवळ सत्तांतर घडवून आणले नाही, तर तो देशच आपल्या दावणीला बांधला. ही खेळी यशस्वी झाल्यापासून ट्रम्प इराणमध्ये असे काही तरी करतील, अशी अटकळ होतीच. ती खरी ठरली. मात्र, इराण म्हणजे व्हेनेझुएला नव्हे, किंवा २००३मधील इराकही नव्हे. तो तुलनेने मोठा आणि प्रत्युत्तर देण्यास सक्षम असलेला देश आहे. त्यामुळे युद्धाची आग भडकत राहण्याची चिन्हे आहेत. पश्चिम आशियात अमेरिकेला रस आहे तो तेलात आणि त्याच्या डॉलरमधील व्यवहारांत. त्याला निर्माण होत असलेले सर्व पर्याय अमेरिका मोडीत काढू पाहत आहे. 'ग्लोबल साउथ' या नावाने विकसनशील देशांचे नेतृत्व करू पाहणाऱ्या भारताने म्हणूनच अमेरिकेच्या या डावपेचांबाबत सावध राहण्याची गरज आहे. पश्चिम आशिया जळत असला, तरी त्याची धग भारतापर्यंत येणार यात शंका नाही.

# लहान मुलांनाही येतोय हृदयविकाराचा झटका... नेमकं कारण काय?

सध्याच्या धावपळीच्या काळात आरोग्याकडे लक्ष देणं फार गरजेचं झालं आहे. आरोग्याकडे थोडा जरी निष्काळजीपणा केला तर तो महागात पडू शकतो. आपण अनेकदा वृद्धांमध्ये, तरूणांमध्ये हृदयविकाराचा झटका आल्याचं ऐकलं आहे. पण, लहान मुलांमध्येही हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका आता दिसू लागला आहे. याचाच प्रत्यय काही दिवसांपूर्वी आला. गुजरातमध्ये नुकतीच एक वेदनादायक घटना समोर आली आहे. शाळेत जेवणाच्या सुट्टी दरम्यान एका विद्यार्थ्याला पायऱ्यांवर हृदयविकाराचा झटका आला आणि त्याचा मृत्यू झाला. तसेच, यावर्षी एप्रिलमध्ये तेलंगणातील एका गावात १३ वर्षांच्या मुलीचाही हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. देशातील लहान मुलांमध्ये हृदयविकाराच्या वाढत्या संख्येने सर्वांनाच चिंतेत टाकलं आहे. आतापर्यंत पालक मुलांच्या हृदयविकाराच्या झटक्याबद्दल निश्चिंत असायचे, पण आता अशा घटनांनी पालकही चिंतेत असल्याचं पाहायला मिळतंय. याच संदर्भात तज्ज्ञांकडून मुलांमध्ये हृदयविकाराचा धोका का वाढतोय या संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात.

### जन्मापासूनच मुलांमध्ये हृदयविकाराचा धोका असतो का?

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, काही मुलांना जन्मापासूनच हृदयविकाराचा धोका असतो. जेव्हा आई गरोदर राहते, तेव्हा मुलांना जन्मजात हृदयविकाराची झळ बसते आणि त्यांना याच भीतीने आयुष्य काढावं लागतं. या आजारात हृदय आणि रक्तवाहिन्यांवर जास्त प्रभाव पडतो. हा हृदयविकाराचा सर्वात मोठा धोका असतो.

### निष्काळजीपणामुळे मुले हृदयविकाराला बळी पडत आहेत का?

या संदर्भात आरोग्य तज्ज्ञांचं म्हणणं असं आहे की, सुदृढ बालकेही जन्माच्या वेळी हृदयविकाराच्या झटक्याला बळी पडत आहेत. पालकांचा निष्काळजीपणाही यामागे एक कारण असू शकतं. मुलांसमोर धुम्रपान, खाण्या-पिण्यात निष्काळजीपणा, अस्वास्थ्यकर जीवनशैली, मुलांना खेळण्यासाठी न पाठवणे, अभ्यासाचा दबाव अशा अनेक कारणांमुळे हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. त्यामुळे लहान वयातच रक्तदाब, शुगर, कोलेस्टेरॉल यांसारखे आजार मुलांमध्ये दिसून येत असून त्यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.

### मुलांमध्ये हृदयविकाराची लक्षणे कोणती?

- त्वचा किंवा ओठ निळसर रंगाचे होतात
- खाण्यास त्रास होणे
- धाप लागणे
- थोडं जरी चालले तरी धाप लागणे
- योग्यरित्या मुलांची वाढ न होणे
- चक्कर येणे, सांधेदुखी आणि छातीत दुखणे

### मुलांमध्ये हृदयविकाराची लक्षणे दिसल्यास काय करावे?

हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणे मुलांमध्ये दिसल्यास पालकांनी त्याकडे दुर्लक्ष करू नये. ताबडतोब मुलांना डॉक्टरांकडे नेऊन तपासण्या करून घ्याव्यात. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच त्यांचे आहार आणि जीवनशैली सुरु ठेवावी.



## पोट दुखत आहे... हे घरगुती उपाय करून पहा



- दहा ग्रॅम गुळ व अर्धा चमचा खायचा चुना एकत्र करून त्याची एक गोळी तयार करावी. ही गोळी एक ग्लास कोमट पाण्यासोबत घेऊन थोडी झोप घ्यावी. थोड्याच वेळेत पोटदुखीवर आराम पडेल.
- जर पोट फारच जोराने दुखत असेल तर आल्याच्या रसामध्ये मध मिसळून त्याचे सेवन करावे. असे केल्याने पोट दुखणे थांबते.
- अर्धा चमचा हळद आणि अर्धा चमचा मीठ एकत्र करून थंड पाण्यासोबत घेतल्याने पोट दुखणे थांबण्यास मदत होते.
- अर्धा चमचा आल्याचा रस व अर्धा चमचा लिंबाच्या रसामध्ये थोडेसे पादरे मीठ टाकून प्यायल्याने पोट दुखी थांबते.
- बिना दूधाचा चहा (कोरा चहा) प्यायल्यानेदेखील पोट दुखणे थांबते. त्यात थोडा लिंबाचा रस टाकल्यास लवकर असर होतो.
- एक ग्लास कोमट पाण्यात एक चमचा बेकिंग सोडा एकत्र करून प्यायल्याने पोट दुखी लगेच थांबते
- चांगल्या प्रकारे शिजलेले तांदूळ एका कॉटनच्या कपड्यात बांधून शेकल्यास पोट दुखी थांबते.
- एक ग्लास पाण्यामध्ये थोडासा गोड सोडा टाकून प्यायल्याने पोट दुखणे थांबते.
- सुंठ, जीरा आणि काळी मिरी सम प्रमाणात घेवून त्याचे चूर्ण बनवून घ्यावे. गरम पाण्यासोबत एक चमचा हे चुर्ण घेतल्याने पोट दुखणे थांबते.

## ३ व्यायामप्रकार आठवड्याभरात करतील चमत्कार



तुमचेही पोट सुटले? पण जीमला जाऊन वर्कआऊट करण्यासाठी तुम्हाला फारसा वेळ नाही? पण सुटलेल्या पोटाचे काहीतरी करावे लागेल असे तुम्हाला मनापासून वाटत असेल तर तुम्ही अगदी सोपे ३ व्यायामप्रकार करुन तुमच्या पोटावरील चरबी कमी करु शकता. हे व्यायाम तुम्ही मनापासून केले तर तुम्हाला हवे असलेले ॲब्जही या व्यायामाने मिळू शकतील. मग आता आपण पाहुया हे ३ चमत्कार करणारे व्यायामप्रकार. करुया सुरुवात

### क्रंचेस

आता पहिला व्यायामप्रकार तुम्हाला करायचा आहे तो म्हणजे क्रंचेस. हा व्यायाम प्रकार तुम्हाला अगदी सहज कुठेही करता येतो. यासाठी तुम्हाला आवश्यकता आहे ती मॅटची. पाठीवर झोपून तुम्हाला गुडघ्यात पाय दुमडून घ्यायचे आहेत. हात मानेखाली किंवा ९० अंशावर घेऊन तुम्हाला कोणताही आधार न घेता उठायचे आहे. जर तुम्ही अगदीच व्यायाम करणारे नसाल तर तुम्हाला पहिल्यावेळी थोडा त्रास होईल. पण कालांतराने तुम्हाला याची अगदी सवय होईल. पहिल्यांदा तुम्ही १० क्रंचेसपासून व्यायामाला सुरुवात करा. पुढे हा आकडा वाढवा. हा व्यायाम प्रकार करताना तुम्हाला तुमच्या पोटाच्या वरील भागावर ताण आलेला जाणवेल.यामुळे तुमचे पोटाचे स्नायू ताणले जातात. पोटाच्या भागात साचलेली चरबी कमी करण्यास हा व्यायाम प्रकार मदत करतो.

### हाफ क्रंचेस

वर जो प्रकार पाहिला तो फुल क्रंचेसमधील होता. असे करताना तुम्ही तुमचे अंग पूर्ण उचलत होता. पण आता तुम्हाला या व्यायामप्रकारात फक्त तुमचे खांदे वर येतील एवढचं शरीर उचलायचे आहे. असे करताना तुमच्या ओटी पोटात तुम्हाला थोडी कळ आलेली जाणवेल. तुमच्या ओटीपोटावरील फॅट कमी करण्यासाठी हा व्यायाम प्रकार मदत करतो. क्रंचेसप्रमाणेच तुम्हाला यामध्ये रिपिटेशन वाढवायचे असतात. म्हणजे सुरुवातीला १० आणि मग नंतर तुम्ही तुमच्या शरीराच्या क्षमतेनुसार हा व्यायाम करु शकता. असे करताना तुमची मान दुखत असेल तर तुम्ही काहीतरी चुकीचं करत आहात.तुम्हाला हा ताण तुमच्या पोटावर येऊ द्यायाचा आहे मानेवर नाही. तुम्ही जर हा व्यायाम प्रकार १५ दिवस करुन पाहिलात तरी तुम्हाला तुमच्यामध्ये झालेला बदल जाणवेल.

### लेग रेस

हा व्यायामप्रकार दिसायला आणि करायला सोपा वाटत असला तरी तुम्हाला हा व्यायामप्रकार फारच फायदेशीर आहे. मॅटवर पाठीवर झोपून तुम्हाला तुमचे दोन्ही पाय ९० अंशावर उचलायचे आहेत. पाय खाली आणताना तुम्हाला हळू आणायचा आहे. कारण असे केल्यानंतरच तुम्हाला ओटीपोटात ताण आलेला अगदी सहजपणे जाणवेल. आता या व्यायामाची सुरुवात तुम्हाला १० पासून करायची आहे. त्यानंतर तुम्ही ते वाढवू शकता. ज्यांना व्यायामाला अगदीच वेळ काढता येत नसेल तर अशांनी किमान हे ३ व्यायामप्रकार करायला काहीच हरकत नाही. तुम्ही जर तुमचा डाएट आणि व्यायामाचे सातत्य कायम ठेवले तर तुम्हाला तुमच्या पोटाचा घेर नक्कीच कमी झालेला दिसेल.

# चेहऱ्यावर इंस्टंट ग्लो हवा असेल तर ट्राय करा 'चॉकलेट फेस पॅक'

वाढते प्रदूषण आणि कामाची दगदग याचा परिणाम तुमच्या त्वचेवर दिसू लागतो. सतत धावपळ आणि कामानिमित्त घराबाहेर राहिल्याने त्वचा कोरडी आणि निस्तेज दिसू लागते. त्यामुळे अचानक एखाद्या पार्टीसाठी अथवा कार्यक्रमासाठी जाताना त्वचेवर पटकन ग्लो यावा असे तुम्हाला वाटू लागते. त्वचेवर असा इंस्टंट ग्लो येण्यासाठी तुम्ही अनेक उपाय करता. कधी कधी यासाठी पार्लरमध्ये महागडी ब्युटी ट्रिटमेंटदेखील घेता. मात्र याचा काहीच फायदा होत नाही. वास्तविक तुमच्या घरातील काही वस्तू वापरूनदेखील तुम्ही तुमची त्वचा तजेलदार आणि तुकतुकीत करू शकता. यासाठी आम्ही तुमच्यासोबत चॉकलेट पासून घरीच तयार केलेले काही फेसपॅक शेअर करत आहोत. चॉकलेटमध्ये त्वचेचे पोषण करण्याचे गुणधर्म असतात. ज्यामुळे तुमची त्वचा मऊ आणि उजळ दिसू लागते. शिवाय चॉकलेटमधील कॅफेनमुळे तुमची त्वचा डिटॉक्स होण्यास मदत होते. यासाठीच हे चॉकलेट फेस पॅक जरूर ट्राय करा.

### चॉकलेट आणि मीठ

तीन चमचे वितळवलेले चॉकलेट, तीन चमचे दूध आणि चिमूटभर मीठ एकत्र करा. चॉकलेट मेल्ट करण्यासाठी चॉकलेट बार एका भांड्यात काढा. गॅसवर एका भांड्यात पाणी गरम करा आणि त्यावर चॉकलेटचे तुकडे असलेले भांडे ठेवा. पाण्याच्या वाफेवर चॉकलेट वितळून पातळ होते. सर्व मिश्रण एकत्र करून तयार केलेला फेसपॅक चेहऱ्यावर लावा आणि वीस मिनीटांनी चेहरा स्वच्छ करा. चॉकलेट फेस पॅक चेहऱ्यावरून काढण्यासाठी कोमट पाणी वापरा. तुमच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा इंस्टंट ग्लो नक्की येईल. शिवाय मीठामुळे त्वचा स्वच्छ होईल आणि चॉकलेट, दूधामुळे त्वचा मऊ आणि चमकदार दिसू लागेल.

### चॉकलेट आणि मध

तीन चमचे कोकोपावडर, तीन चमचे मेल्ट केलेले चॉकलेट, दोन चमचे सेंद्रिय मध, तीन चमचे शूद्ध क्रीम आणि दोन चमचे ओट्सची पावडर घ्या. सर्व मिश्रण एकत्र करा आणि चेहऱ्यावर लावा. हा फेस पॅक एक उत्तम स्क्रबर आहे. ज्यामुळे तुमच्या त्वचेवरील डेडस्किन निघून जाईल. शिवाय चेहरा चमकदार आणि उजळ दिसू लागेल. जर तुम्हाला एखाद्या पार्टीसाठी तयार व्हायचं असेल आणि तुम्हाला पार्लरमध्ये जाण्यासाठी वेळ नसेल तर हा फेसपॅक जरूर लावा. ज्यामुळे तुमची त्वचा फ्रेश दिसू लागेल.



### चॉकलेट आणि कोको पावडर

तीन चमचे मध, दोन चमचे डार्क चॉकलेटची पावडर, एक चमचा कोको पावडर आणि दोन चमचे दूध एकत्र करा. या सर्व मिश्रण एकत्र करून चेहरा आणि मानेवर एकसमान लावा. फेसपॅक सुकल्यावर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ करा. चांगला रिझल्ट हवा असेल तर आठवड्यातून कमीत कमी दोन ते तीन वेळा तुम्ही ट्राय करू शकता.

### चॉकलेट आणि पिठीसाखर

वितळवलेले चॉकलेट, मध, लोणी आणि पिठी साखर मिसळून एक फेसपॅक तयार करा. हा पॅक चेहऱ्यावर लावा आणि वीस मिनीटांनी चेहरा कोमट पाण्याने धुवून टाका. महिन्यातू दोन ते तीन वेळा हा फेसपॅक लावल्यास चांगला परिणाम दिसून येतो. चॉकलेटपासून घरीच तयार केलेले हे फेसपॅक तुम्हाला कसे वाटले आणि त्याचा तुम्हाला काय फायदा झाला हे आम्हाला कंमेट बॉक्समध्ये जरूर कळवा.

## ग्रीन टीचा होऊ शकतो नुकसान

ग्रीन टी पिण्याचे अनेक फायदे आहेत. आजकाल वजन कमी करण्यासाठी 'मसाला चहा' ऐवजी 'ग्रीन टी' घेण्याला प्राधान्य दिलं जातं. ग्रीन टी हे एक 'आरोग्यदायी पेय' म्हणूनदेखील प्रसिद्ध आहे. सहाजिकच यामुळे जगभरात सध्या ग्रीन टी पिण्याचे प्रमाण नक्कीच वाढलं आहे. मात्र असं असलं एक ते दोन कपपेक्षा जास्त ग्रीन टी पिणं आरोग्यासाठी मुळीच हितकारक नाही. एवढंच नाही तर ग्रीन टी मुळे काही लोकांच्या समस्या अधिक वाढू शकतात. यासाठीच जाणून घ्या कोणत्या लोकांनी ग्रीन टी मुळीच पिऊ नये.

**गरोदर आणि स्तनपान देणाऱ्या महिला –** ज्या महिला गरोदर असतील अथवा भविष्यात बाळासाठी प्रयत्न करत असतील अशा महिलांनी ग्रीन टी पिणे टाळावे. कारण ग्रीन टी पिण्यामुळे तुमच्या गर्भधारणेतील अडचणी वाढू शकतात. ग्रीन टी मधील कॅफेनचा तुमच्या बाळाच्या मेंदूच्या वाढ आणि विकासावर विपरित परिणाम होऊ शकतो. ज्यामुळे गरोदपणातील समस्या अधिक वाढण्याची शक्यता असते. यासाठीच गरोदरपणातील नऊ महिने आणि गर्भधारणेसाठी प्रयत्न करत असताना महिलांनी ग्रीन टी न पिणंच योग्य राहील. याचप्रमाणे स्तनपान देणाऱ्या महिलांनीदेखील ग्रीन टी पिणे टाळावे.

**लोहाची कमतरता असलेले रूग्ण –** ज्या लोकांच्या शरीरात लोहची कमतरता असते त्यांना ॲनिमियाचा त्रास जाणवतो. अशा अशक्तपणा आलेल्या ॲनिमिक लोकांनी ग्रीन टी पिऊ नये. कारण ग्रीन टी मुळे तुमच्या शरीरातील लोह अधिक प्रमाणात शोषून घेतलं जातं आणि तुमच्या शरीरातील लोहची कमतरता अधिक वाढू शकते. वास्तविक या काळात तुम्ही लोहयुक्त आहार घेणं गरजेचं आहे . यासाठीच ग्रीन टी पासून शक्य तितकं दूर राहा.

**पोटाच्या समस्या असलेले लोक –** ग्रीन टीमधील काही घटकांमुळे तुमच्या पोटातील ॲसिड वाढण्याची शक्यता असते. ज्यामुळे तुमच्या पोटात दुखणे, उलटी, मळमळ, पोटात गोळा येणे अशी लक्षणे जाणवू शकतात. ज्या लोकांना आधीच पोटाच्या समस्या आहेत अशा लोकांनी ग्रीन टी न पिणंच योग्य राहील. याचप्रमाणे इतर लोकांनीदेखील उपाशीपोटी कधीच ग्रीन टी पिऊ नये. कारण यामुळे तुमच्या पोटात दुखण्याची शक्यता आहे. ग्रीन टी नेहमी जेवणानंतर अथवा दोन जेवणाच्या मध्येच घ्या.


**हृदयविकार असणारी माणसे –** ज्यांना हृदय विकार अथवा रक्तदाबाची समस्या आहे अशा लोकांनी शक्य तितक्या कमी प्रमाणात ग्रीन टीचा वापर करावा. कारण ग्रीन टीमुळे तुमच्या हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात. जर तुम्ही हृदयसमस्येसाठी औषधे घेत असाल तर ग्रीन टी पिण्यामुळे या औषधांचा परिणाम कमी होऊ शकतो.

**मधुमेही –** मधुमेही वजन कमी करण्यासाठी आणि रक्तातील साखर कमी करण्यासाठी ग्रीन टी पितात. मात्र ग्रीन टीमुळे तुमच्या रक्तातील साखरेच्या परिणामामध्ये फरक पडू शकतो. यासाठी ग्रीन टी पिल्यानंतर तुमच्या रक्तातील साखर अवश्य तपासा. दिवसभरात एकदा ग्रीन टी पिण्यास काहीच हरकत नाही मात्र हे प्रमाण मुळीच वाढवू नका.

**लहान मुले –** ग्रीन टी मधील काही घटकांमुळे तुमच्या मुलांच्या शरीराचे पोषण कमी होऊ शकते. मुलांच्या शरीरासाठी आवश्यक असणाऱ्या पोषकमुल्यांमध्ये ग्रीन टीचे टॅनिन अडथळा निर्माण करू शकते. म्हणूनच लहान मुलांना ग्रीन टी पिण्यास देऊ नका. जर तुमची मुलं हट्ट करत असतील तर त्यांना याचे परिणाम समजावून सांगा.



## उपवास - खरा अर्थ काय?



भारतीय आणि उपवास यांचे नाते आपण चांगलेच जाणून आहोत, त्यातही इतर गोष्टींप्रमाणेच महाराष्ट्र यातही आघाडीवर आहे. अनेक देवदेवता, त्यांची नवरात्रे, शिवाय रामनवमी, हनुमानजयंती, जन्माष्टमी, गणेशजयंती असे अनेक उपास, याखेरीज महाशिवरात्र,आषाढी आणि कार्तिकी एकादशी, मासिक नियमित उपासंमध्ये चतुर्थी, दोन एकादश्या, प्रदोष आणि शिवाय साप्ताहिक ज्याचा त्याचा सोमवार ते रविवार असा कोणताही वार, अशी ही न संपणारी जंत्री आहे.

बर उपास का करता असं विचारलं तर त्याचं पटेल असं उत्तर कोणालाही सांगता येत नाही .आमच्या घरची पद्धत आहे, लहानपणापासून करत आलो आहोत, अहो देवाचं असं मधेच सोडता येतं का अशी उत्तरं मी अनेक वर्षं रुग्णांकडून ऐकत आले आहे. उपवास म्हणजे जवळ बसणे म्हणजे काय तर शरीराची, खाण्याची चिंता सोडून सगळे तनमन देवाशी एकाग्र करून देवाच्या जवळ बसणे. आपल्यापैकी किती जण असा उपवास करतात सांगा पाहू? उलट भजन, कीर्तन करून येणाऱ्या बायकांची चर्चा ऐकली तर हसू येते. चला, जाताजाता मला केळी, खजूर आणि राजगिरा लाडू घ्यायचे आहेत, घरी जाऊन खिचडी परतायची आहे असे संवाद ऐकू येतात. काही विशेष उपवास म्हणजे जे सामान्यपणे सगळ्या कुटुंबाने करणे अपेक्षित असते, तेव्हातर विचारूच नका, बायकांचा पूर्ण दिवस स्वैपाकघरात जातो. उपासाला चालणारे असे म्हणून जेव्हढे काही पदार्थ असतील ते सगळे ताटात अवतीर्ण होतात. साबुदाणा, शेंगदाणे, भगर, राजगिरा, बटाटे, रताळी काही काही बाकी ठेवलं जात नाही. त्यामुळे उलट नेहमीचं जेवण परवडल असं आपलं पोट म्हणत असेल. त्यामुळेच 'एकादशी आणि दुप्पट खाशी' ही जी म्हण आपल्याकडे उपासाच्या बाबतीत वापरली जाते ती बरोबरच आहे. उपवासाचे सगळे पदार्थ खाऊन पित्त वाढते, बटाटे खाऊन पोट गुबारत, गच्च होतं. मग दुसऱ्या दिवशी कोणाचं डोकं दुखत, कोणाला उलट्या होतात, कोणाला जुलाब होतात तर कोणाला अजीर्ण नाहीतर मलबद्धता!! इतके त्रास करून उपास करा असं कोणता देव सांगतो सांगा बरं? खरं तर उपवास किंवा लंघन ही एक अतिशय उपयोगी अशी चिकित्सा म्हणून आयुर्वेदानेही वर्णन केली आहे. काही आजार असे असतात की ज्यात अन्न खाण्याने किंवा नियमित आहार घेण्यामुळे दोष आणि पयार्याने तो आजारही वाढतो म्हणून मग पूर्ण उपास किंवा केवळ गरम पाणी, फक्त दूध, पेज, पातळ भात किंवा कढण असा आहार वैद्याकडून सुचवला जातो, जो औषधाचा परिणाम अधिकच सुधारण्यास मदत करतो. अश्यावेळी मात्र रुग्ण अरे बापरे! फक्त दूध प्यायचं? पोट भरेल का? असे प्रश्न विचारतात. एरवीही आपल्याकडे जास्तीतजास्त उपवास हे पावसाळ्यात करायला सांगितले आहेत, म्हणजे एका वेळेचाउपास आणि रात्री जेवण किंवा नक्त, कधी दोन्ही वेळेचे उपास असे अनेक प्रकारे केले जातात. याचे प्रमुख कारण असे की चातुर्मास सुरु होतो तो पावसाळ्याच्या सुरुवातीला!! जेव्हा पाऊस नुकताच सुरु होतो तेव्हा पाणी जड असते, हवा गार असते आणि पचनशक्ती मंदावलेली असते, त्यामुळे लंघन करून या पचन शक्तीला मदत करण्याच्या हेतूने उपवासाची योजना केलेली आहे. पावसाळ्यात तळलेले खाऊ नये, जड खाऊ नये, हलकाच आहार घ्यावा हे सगळे नियम आपल्या शरीराच्या भल्यासाठीच आहेत पण आपण ते सगळे नियम धाब्यावर बसवून आपल्याला आवडतील, जिभेचे चोचले पुरवतील असे पदार्थ शोधून शोधून खातो. साबुदाणा वडे काय, बटाटा वेफर्स काय, dryfruits काय, पेढे बर्फी काय !!

त्यामुळे हल्ली जेव्हा मला काही पेशंट विचारतात की उपास करू का ?तेव्हा मी त्यांना उपवास असं नाव न घेता Diet Plan म्हणून काही नियम लिहून देते, जे खास पावसाळ्यातील स्वास्थ्य रक्षणाचे आहेत आणि ही मात्रा बरोबर लागू पडते. हल्लीच्या पिढीला त्यांच्याच भाषेत सांगितलेलें बरं असा विचार करते.

## सुंदर आणि काळेभोर केस हवे असतील तर असा करा मधाचा वापर



### केसांची वाढ

मध हे एक नैसर्गिक ॲटी ऑक्सिडंट आहे. ज्यामुळे तुमच्या केसांची त्वचा मजबूत आणि स्वच्छ होते. केसांची मुळं आणि त्वचा स्वच्छ असेल तर केस आपोआप मजबूत होतात. यासाठी दोन चमचे मधामध्ये एक चमचा पुदिन्याचे तेल आणि नारळाचे तेल मिसळा. या मिश्रणाचा एक हेअरमास्क तयार करा आणि केसांना लावा. काही मिनीटांनी केस थंड पाण्याने स्वच्छ धुवून टाका. लिबांच्या पाण्याने केस धुवून तुम्ही केसांना नैसर्गिक पद्धतीने कंडीशनर करू शकता.

### नैसर्गिक पद्धतीने केसांना हायलाईट करण्यासाठी

केसांना त्रासदायक केमिकल्स न वापरता तुम्ही नैसर्गिक पद्धतीने हायलाईट करू शकता. मधामध्ये असे काही घटक असतात ज्यामुळे तुमचे केस नैसर्गिक पद्धतीने हायलाईट होऊ शकतात. केसांना नैसर्गिक रंग आणि चमक देण्यासाठी तुम्हाला मध नक्कीच उपयोगी पडू शकते. यासाठी चार चमचे मधामध्ये एक चमचा पाणी टाका. काही मिनीटे हे मिश्रण तसेच ठेवा. केसांवर हे मिश्रण लावून वीस मिनीटे तसेच ठेवा. वीस मिनीटांनी केस स्वच्छ धुवा आणि केसांना कंडिश्नर करा. जर आणखी गडद रंग हवा असेल तर या मिश्रणामध्ये लिंबू पिळा. जर लालसर छटा हव्या असतील तर या मिश्रणामध्ये दालचिनी मिसळा

### केस मऊ करण्यासाठी

मध हे एक नैसर्गिक सॉफ्टनर आहे. ज्यामुळे केसांचा कोरडेपणा कमी होतो. शिवाय मधात गोडाचे प्रमाण अधिक असल्यामुळे केस मजबूतदेखील होतात. यासाठी वर्जिन ऑलिव्ह ऑईलमध्ये शुद्ध मध मिसळून मिश्रण थोडं कोमट करा. स्वच्छ केसांवर हे मिश्रण लावा. केसांवर ३० मिनीटे शॉवर कॅप लावून ठेवा. केसांना शॅंपू करा आणि केस स्वच्छ करा.


### कोंडा कमी करण्यासाठी

मधामध्ये ॲटी बॅक्टेरिअल गुणधर्म असतात. ज्यामुळे केसांची जंतूसंसगार्पासून सुटका होते. केसांवर मध लावल्यामुळे कोंडा कमी होतो आणि डोक्यात खाज येत नाही. यासाठी मधात थोडं पाणी मिसळून ते केसांवर लावा. तीस मिनीटे केसांवर कॅप लावा आणि केस नंतर धुवून टाका. केस धुण्यासाठी शॅम्पू वापरू नका.

### केस चमकदार करण्यासाठी

मधामुळे केस चमकदार होतात. जर तुमचे केस कोरडे आणि निस्तेज झाले असतील तर हा उपाय तुमच्यासाठी नक्कीच उपयुक्त आहे. यासाठी दोन कप पाण्यामध्ये पाच मोठे चमचे मध मिसळा. शॉवर कॅप लावून तीस मिनीटांनी केस धुवून टाका. मधाचा अशा प्रकारे वापर करून तुम्हाला तुमच्या केसांमध्ये आश्चर्यकारक बदल दिसू लागतील.

## सकाळी दात न घासता पाणी पिणं योग्य की अयोग्य?



शरीरासाठी पाणी किती महत्त्वाचे आहे हे कोणापासून लपलेले नाही. पोटाच्या अनेक आजारांसाठी आणि स्वतःला हायड्रेट ठेवण्यासाठी पाणी खूप महत्त्वाचे आहे. डॉक्टरांच्या मते, दररोज 8-10 ग्लास पाणी प्यावे. पण बरेच लोक सकाळी ब्रश करण्यापूर्वी पाणी पितात. आज आपण हे जाणून घेणार आहोत की असे करणे खरोखरच आरोग्यासाठी फायदेशीर आहे का.

### ब्रश करण्यापूर्वी पाणी पिण्याचे फायदे

### डायजेशन चांगले होते

जर तुम्ही ब्रश करण्यापूर्वी पाणी पित असाल तर असे केल्याने तुमची पचनशक्ती चांगली राहते. तसेच तुमचे अन्न सहज पचते. शरीरात साचलेले अनेक आजार जसे आळस येणे, मुरुम येणे, पोटाचे आजार, अपचनाची समस्या, ब्रश न करता पाणी प्यायल्यास शरीरातील घाण निघून जाते. सकाळी शरीराला हायड्रेट ठेवणे खूप महत्वाचे आहे. झोपेच्या वेळी म्हणजे 7-8 तासांच्या दरम्यान आपण पाणी पीत नाही. अशा स्थितीत तुम्ही सकाळी सर्वात आधी पाणी प्यावे जेणेकरुन तुमचे शरीर आधी हायड्रेटेड राहील.

### इम्युनिटी वाढते

सकाळी दात न घासता पाणी प्यायलात तर तुमची रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि अनेक आजारांपासूनही तुमचा बचाव होतो.

### हाय ब्लडप्रेशर आणि हाय शुगर नियंत्रित करते

तुम्ही सकाळी ब्रश न करता पाणी प्यायल्याने उच्च रक्तदाब आणि साखर नेहमी नियंत्रणात राहते. तसेच कोमट पाणी प्यायल्यास रक्तातील साखर नेहमी नियंत्रणात राहते. याशिवाय लठ्ठपणाची समस्याही दूर राहते.

# ठाणे महापालिकेसमोर २९० कोटींचे शिवधनुष्य
# कर न भरणाऱ्यांना कडक कारवाईचा इशारा



**अनिवासी मालमत्तांबाबत स्वतंत्र मोहीम**

पाणीपुरवठा विभागाकडून नळजोडणी खंडित करण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. अनिवासी मालमत्तांबाबत स्वतंत्र मोहीम राबवून जप्ती व सील करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. संबंधित आदेश सर्व सहाय्यक आयुक्त व परिमंडळ उपायुक्तांना देण्यात आले आहेत. कर वसुली वाढविण्यासाठी मोठ्या गृहसंकुलांमध्ये विशेष शिबिरे आयोजित करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या आहेत. नागरिकांनी थकबाकी तातडीने भरावी, अन्यथा अप्रिय कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

ठाणे महानगरपालिकाच्या मालमत्ता कर विभागाला यंदा ९२० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. मात्र जानेवारी अखेरपर्यंत पालिकेच्या तिजोरीत ५६५ कोटी रुपये जमा झाले होते. त्यानंतर फेब्रुवारी अखेर ही रक्कम ६३० कोटींवर पोहोचली आहे. त्यामुळे आता अवघ्या एका महिन्यात २९० कोटी रुपयांची वसुली करण्याचे मोठे आव्हान विभागासमोर उभे ठाकले आहे.

गेल्या एक-दोन महिन्यांपासून अपेक्षेप्रमाणे वसुली होत नसल्याने प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. कर न भरणाऱ्या निवासी मालमत्ताधारकांचे नळजोडणी खंडित करणे, अनिवासी मालमत्तांवर जप्ती व सील करण्याची कारवाई करणे, तसेच वॉरंट बजावणे अशा उपाययोजना राबविण्याचे आदेश आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

मागील वर्षी मालमत्ता कर विभागाला ८५० कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी ८१० कोटींची वसुली करण्यात यश आले होते. यंदा मात्र उद्दिष्ट ९२० कोटींवर नेण्यात आले आहे. आता उर्वरित एका महिन्यात २९० कोटींचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विभागाला मोठे शिवधनुष्य पेलावे लागणार आहे.

# रस्ते अपघाताच्या एसओपीचे आदेश, मुख्यमंत्र्यांची माहिती



**अपघातग्रस्त टँकर एअरलिफ्ट करण्याची चाचणी-सरनाईक**

आपत्कालीन परिस्थितीत आपण हेलिकॉप्टर वापरतो. पण सूर्यास्तानंतर आपल्याकडे हेलिकॉप्टर वापरता येत नाही. त्यामुळे त्यांच्या वापरावर मर्यादा आहेत. इतर मोठ्या देशांमध्ये वायुगळती झाल्यानंतर असे टँकर एअरलिफ्ट करून नेण्याची पद्धत आहे. हा पर्याय आपल्याकडेही वापरता येऊ शकतो का याची चाचणी एमएसआरडीसीच्या माध्यमातून करण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिली.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर झालेल्या टँकर अपघात आणि त्यानंतरच्या वाहतूक कोंडीवर घाईने उपाययोजना करणे अपेक्षित होते. मात्र, तेवढ्या जलद गतीने उपाययोजना झाली नसल्याची कबुली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. मात्र, त्याचवेळी ज्वलनशील आणि धोकादायक पदार्थांच्या वाहतूक करणाऱ्या टँकरचा अपघात झाल्यास काय करायचे याची प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) ठरविण्यास केंद्र सरकारच्या अखत्यारीतील तेल कंपन्यांना आदेश देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबई-पुणे महामार्गावर ३ फेब्रुवारी रोजी प्रोपिलिन ज्वलनशील रसायन वायू वाहून नेणारा टँकर उलटल्याने झालेल्या वाहतूक कोंडीबाबतच्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या चेतन तुपे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, भविष्यात पुन्हा कधी अशी दुर्घटना घडून नये यासाठी अशा पदार्थांची वाहतूक करणार्या कंपन्यांना यासंदर्भात एसओपी तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या पद्धतीच्या आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित उपाय तातडीने करण्यासाठीची रेस्क्यु यंत्रणा, साधनसामुग्री आपल्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. याद्दष्टीने यंत्रणांना सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बसवण्यात आलेली आयटीएमएस ही प्रणाली सध्या कार्यरत आहे. या प्रणालीचा उपयोग करून अशा प्रकारच्या अपघाताच्या प्रसंगी माहिती नागरिकांपर्यंत त्वरित पोहोचवता येईल आणि ट्रॅफिकचे व्यवस्थापन, नियंत्रण, तसेच डायव्हर्शन सुकर करता येईल.आयटीएमएसचा उपयोग करुन अशा घटनांमध्ये प्रवाशांना तातडीने सूचना देण्यासाठीची ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन प्रत्येक प्रवाशास अशा पद्धतीच्या परिस्थितीचा संदेश तत्काळ देता येईल.यासाठीची व्यवस्था करण्याचे आदेश देण्यात येतील, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

तत्पूर्वी, या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत सहभागी होताना शिवसेना ठाकरे गटाच्या आदित्य ठाकरे यांनी हॅजमॅट व्हेईकल (धोकादायक पदार्थांची वाहतूक करणारे वाहन) युनिट तसेच बोगद्यात आग लागल्यास अग्नीशमन युनिट उभारण्याची मागणी केली. तसेच हॅजमॅट व्हेईकलच्या वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी रस्ते देखील सुरक्षित असावेत. खड्डयांमुळे त्यातील गॅस उचंबळू नये याची खबरदारी घेण्याची आवश्यकता आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केली. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जयंत पाटील यांनी अशा परिस्थितीत पोलीस किंवा संबंधित यंत्रणेला घटनास्थळी पोहोचण्यासाठी हेलिकॉप्टरची व्यवस्था करणे तसेच प्रवाशांना लाईव्ह माहिती पोहोचविण्याची मागणी केली.

# ठाणे आणि विरार बुलेट ट्रेन स्थानक होणार स्मार्ट... एमएमआरडीएचा मास्टर प्लॅन



ठाणे आणि विरार बुलेट ट्रेन स्थानक परिसराचा विकास कसा साधायचा हे ठरविण्यासाठी नुकतीच एमएमआरडीएच्या वांद्रे-कुर्ला संकुल येथील कार्यालयात एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या आणि जायकाच्या अधिकाऱ्यांनी, तज्ज्ञांनी या कार्यशाळेस हजेरी लावली. यावेळी जायका आणि केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या मदतीने स्थानक परिसर विकासासाठी विकास आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. लवकरच हा आराखडा तयार करून स्थानक परिसराचा विकास मार्गी लावला जाणार आहे.

**■ठाणे। प्रतिनिधी,**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील महाराष्ट्रातील ठाणे आणि विरार बुलेट ट्रेन स्थानक परिसराचा कायापालट करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घेतला आहे. स्टेशन एरिया डेव्हलपमेन्ट अलाँग द मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल कॉरिडोअर (स्मार्ट) अंतर्गत ठाणे आणि विरार बुलेट ट्रेन स्थानक परिसराचा विकास करणार आहे.

यासाठी केंद्र सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय आणि जपान आंतरराष्ट्रीय सहकार संस्था (जायका) यांच्या मदतीने यासाठी एमएमआरडीएकडून विकास आराखडा तयार केला जाणार आहे. स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत स्थानक परिसरात प्रवाशांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

मुंबई - अहमदाबाद अंतर केवळ दोन ते अडीच तासात पार करता यावे यासाठी नॅशनल हाय-स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पात अंदाजे ५०८ किमीच्या या मार्गात एकूण १२ स्थानकांचा समावेश आहे. यात बीकेसी, ठाणे, विरार आणि पालघर ही चार स्थानके आहेत.

बुलेट ट्रेन कार्यान्वित झाल्यानंतर स्थानक परिसरात प्रवाशांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्यानुसार आता बुलेट ट्रेन स्थानक परिसराच्या एकात्मिक विकासासाठी एमएमआरडीएने पुढाकार घेतला आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर बीकेसी आणि पालघर स्थानक परिसराचाही ठाणे - विरार स्थानकांच्या धर्तीवर विकास करण्यात येणार असल्याची माहिती एमएमआरडीएने दिली.

# ‘एनसीएमसी स्मार्ट कार्ड’ला उत्स्फूर्त प्रतिसाद
## एसटीच्या कार्ड नोंदणीचा आठवड्यात १ लाखांचा टप्पा पार




**‘एनसीएमसी स्मार्ट कार्ड’ची सक्ती नाही**

१ मार्चपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड असल्याशिवाय सवलत धारक प्रवाशांना प्रवास करता येणार नाही, अशी अफवा समाज माध्यमांवर पसरली होती. तथापि, जोपर्यंत ८० टक्के सवलत धारक प्रवाशांची स्मार्ट कार्डची नोंदणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य केले जाणार नाही, असे एसटी महामंडळाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रवाशांनी आपल्या जवळच्या बसस्थानक, आगार अथवा अधिकृत खासगी एजंटकडे स्मार्ट कार्ड नोंदणी करावी, असे आवाहन महामंडळातर्फे केले आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) डिजिटल सेवांच्या दिशेने पाऊल टाकत ‘एनसीएमसी स्मार्ट कार्ड’ उपक्रम हाती घेतला आहे. सवलतधारक प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आठवड्यात नोंदणीच्या संख्येने १ लाखांचा टप्पा गाठला आहे. यामध्ये ‘महिला सन्मान योजना’ लाभार्थ्यांचा सर्वाधिक सहभाग आहे.

केवळ आठवड्याभरात या उपक्रमांतर्गत एकूण १ लाख २१ प्रवाशांनी ‘एनसीएमसी स्मार्ट कार्ड’साठी नोंदणी केली आहे. यात ‘महिला सन्मान योजना’ लाभार्थ्यांचा सर्वाधिक सहभाग असून तब्बल ३७ हजार ९२७ महिलांनी या आधुनिक सुविधेचा स्वीकार केला आहे. त्याचप्रमाणे ‘अमृत ज्येष्ठ नागरिक’ योजनेंतर्गत ३४ हजार ९४८ ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणी केली आहे. तसेच इतर ज्येष्ठ नागरिक २४ हजार ९२७ आणि इतर प्रवासी २ हजार २१९ अशा विविध घटकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

एसटी महामंडळाचा हा उपक्रम केवळ तांत्रिक बदल नसून, प्रवाशांच्या प्रवासाला अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक बनविण्याचा दूरदर्शी प्रयत्न आहे. रोख व्यवहारांच्या पारंपरिक चौकटीतून बाहेर पडत, डिजिटल माध्यमांचा स्वीकार करण्यासाठी प्रवासी मोठ्या प्रमाणात पुढे आले आहेत.

भविष्यात एनसीएमसी स्मार्ट कार्डमुळे सवलत धारक प्रवाशांना तिकीट खरेदी अधिक सुलभ होणार असून, भविष्यात एकच कार्ड विविध सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी उपयोगात येण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

**भविष्यात सर्व वाहनांसाठी एकच कार्ड**

भविष्यात एनसीएमसी स्मार्ट कार्डमुळे सवलतधारक प्रवाशांना तिकीट खरेदी करणे अधिक सुलभ होणार असून, भविष्यात एकच कार्ड विविध सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी उपयोगात येण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. एसटी महामंडळाने हाती घेतलेला हा अभिनव उपक्रम डिजिटल महाराष्ट्राच्या स्वप्नाला साकार करण्याच्या दिशेने एक भक्कम पाऊल ठरत असून, प्रवाशांच्या विश्वासाच्या बळावर हा प्रवास अधिक वेगाने पुढे जात आहे असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

# छतावरील सौरऊर्जा प्रकल्पाच्या खर्चात होणार बचत... प्रति किलोवॉट १५ हजारांचा होणार फायदा

**■मुंबई। प्रतिनिधी,**

महावितरणने मागविलेल्या टेंडरमध्ये एक किलोवॉट क्षमतेच्या छतावरील सौरऊर्जा प्रकल्पाची किंमत सुमारे ४५ हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे. सध्या सौरऊर्जा पुरवठादार आकारत असलेल्या साठ हजार रुपये या दराच्या तुलनेत नवा दर १५ हजार रुपये कमी असल्याने योजनेच्या ५ लाख छोट्या ग्राहकांची खूप मोठी बचत होणार आहे. तसेच साठ हजारच्या ऐवजी ४५ हजार रुपयात एक किलोवॉटचा छतावरील सौरऊर्जा बसविता येत असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे आगामी काळात असे प्रकल्प बसविणाऱ्या सर्व गरजू ग्राहकांना लाभ होणार आहे.

गरीब ग्राहकांसाठी स्मार्ट योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी महावितरणला अंमलबजावणी यंत्रणा म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी मुंबईत झालेल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत स्मार्ट योजनेच्या निविदेला मान्यता देण्यात आली.




राज्य सरकारच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार (स्मार्ट) योजनेच्या शासननिर्णयात प्रति किलोवॉट पन्नास हजार रुपये खर्च गृहित धरला आहे. सध्या व्यवहारात सोलर पुरवठादार व्यावसायिक ग्राहकांकडून प्रति किलोवॉट सुमारे साठ हजार रुपये आकारत आहेत. पण महावितरणने आज मंजूर केलेल्या निविदेमध्ये प्रती किलोवॉट ४५,४५० रुपये इतकी रक्कम स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे या योजनेत ग्राहकाने भरायच्या हिश्श्याच्या रकमेत आता मोठी कपात होईल.

केंद्र सरकारने फेब्रुवारी २०२४ मध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. यामध्ये घरगुती वीज ग्राहकांना छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी एक किलोवॉटला तीस हजार रुपये, दोन किलोवॉटला साठ हजार रुपये व तीन किलोवॉटला ७८ हजार रुपये थेट अनुदान मिळते. उर्वरित खर्च ग्राहकाने करायचा असतो. एक किलोवॉटच्या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. ग्राहकाच्या गरजेपेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीजबिल शून्य येते व ग्राहकाला अतिरिक्त वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळते. राज्य सरकारने या योजनेत राज्यातर्फे आणखी अनुदान देऊन दारिद्र्यरेषेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पाच लाख ग्राहकांसाठी स्मार्ट योजना आणली आहे. प्रत्येकी एक किलोवॉटचे सौरऊर्जा प्रकल्प या योजनेत बसविण्यात येतील.

# मधुचंद्राच्या रात्री नवऱ्यावर चाकूने हल्ला केला अन् काकासोबत पळाली नववधू, काकावर जडला होता जीव

**कुटुंबियांना दिले गुंगीचे औषध**

पीडित पतीने सांगितले की, 'चाकूच्या हल्ल्यानंतर मी घाबरलो होतो आणि दुसऱ्या दिवशी तिच्या माहेरच्यांना बोलावून घेतले. त्यांनी तिची समजूत काढली, पण तिचा हेतू वेगळाच होता. तिसऱ्या दिवशी रात्री तिने जेवणात गुंगीचे औषध मिसळून संपूर्ण कुटुंबाला बेशुद्ध केले. आम्ही सर्वजण बेशुद्ध असताना ती घरातील सोन्याचे दागिने आणि रोकड घेऊन पसार झाली.'



**■मुंबई। प्रतिनिधी,**

मधुचंद्राची रात्र म्हणजे नवरा आणि बायकोच्या नव्या आयुष्याची एक गोड सुरुवात. मात्र याच रात्री एका नवऱ्यासोबत धक्कादायक घटना घडली आहे. मधुचंद्राच्या रात्री एका नववधूने आपल्या पतीवर चाकूने हल्ला करुन जखमी केले आणि त्यानंतर घरातील लाखो रुपयांचे दागिने आणि रोकड घेऊन आपल्या प्रियकरासोबत पळून गेली.

धक्कादायक म्हणजे, हा प्रियकर दुसरा तिसरा कोणी नसून तिचा काकाच आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. उत्तर प्रदेशातील हाथरस परिसरातील ही घटना आहे.

**'मी मरेन नाहीतर तुला मारेन'**

२१ फेब्रुवारी रोजी या जोडप्याचा विवाह झाला होता. २२ फेब्रुवारीला नवरी आपल्या सासरी पोहोचली. मधुचंद्राच्या रात्री जेव्हा पती तिच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करू लागला, तेव्हा तिने त्याला स्पर्श करण्यास मनाई केली. पतीने अधिक प्रयत्न केला असता, तिने रागाच्या भरात 'एक तर मी मरेन किंवा तुला मारीन' अशी धमकी दिली आणि चाकूने पतीच्या हातावर वार केला.

**काकासोबत होते प्रेमसंबंध**

तपासादरम्यान धक्कादायक माहिती समोर आली आहे की, संबंधित नववधूचे तिच्याच नात्याने काका लागणाऱ्या व्यक्तीसोबत प्रेमसंबंध होते. घरातून पळाल्यानंतर ती त्याच काकासोबत गेल्याचे समजते. पीडित पतीने पोलिसात धाव घेऊन तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला असून आरोपी महिलेचा आणि तिच्या काकाचा शोध सुरु केला आहे. नवरीने घरातून नेमकी किती रोकड चोरली, याचा पोलीस पंचनामा करत आहेत.

# तरुणीचा मानसिक छळ, ३ पुरुष सतत करत होते ब्लॅकमेल
# पंख्याला गळफास घेत संपवलं जीवन

**■मुंबई। प्रतिनिधी,**

नोएडात फेज 3 मध्ये पोलीस ठाणे परिसरात एक खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. एका तरुणीने आत्महत्या करत आपलं जीवन संपवलं. या प्रकरणी कुटुंबीयांच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तरुणीसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र, सुरुवातीला पोलीस तपासात अद्याप ब्लॅकमेलिंगच्या आरोपांची पुष्टी करण्यात आलेली नाही.

**तरुणीने छताच्या पंख्याला गळफास घेत संपवलं जीवन**

२१ फेब्रुवारी २०२६ रोजी, तरुणीने तिच्या घरातच छताच्या पंख्याला गळफास घेत जीवन संपवलं. घटनेची माहिती मिळताच, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणात आरोपीने मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवला. अंत्यसंस्कारानंतर 27 फेब्रुवारी रोजी कुटुंबाने फेज 3 पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात कारवाई करत पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली. इतर दोघांचा शोध देखील घेण्यात आला. दरम्यान, एडीसीपी सेंट्रल नोएडा आरके गौतम म्हणतात की, आतापर्यंतच्या तपासात ब्लॅकमेलिंगचे कोणतेही ठोस पुरावे आढळून आलेले नाहीत.

# अमेरिकेत शिकलेल्या अन् तगड्या पगाराच्या मुलाशी लग्न, पण ३ महिन्यातच तरुणीने इमारतीवरुन उडी मारून जीव दिला



मृत विवाहितेचे नाव गंगा तेजस बेंबळकर (वय 27, रा. पिओनी सोसायटी, योगी पार्क, बाणेर) असे आहे. तिचे वडील शरणकुमार मल्लिकार्जुन माशाळ (वय ५९, रा. कलबुर्गी, कर्नाटक) यांनी याबाबत फिर्याद दिलीये. या प्रकरणी पती तेजस शिवा बेंबळकर (वय ३१), सासू उज्ज्वला शिवा बेंबळकर (वय ५८), सासरे शिवा माणिकराव बेंबळकर (वय ६२) आणि नणंद रिया शिवा बेंबळकर (वय ३३) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**■पुणे। प्रतिनिधी,**

शहरात पुन्हा एकदा हुंडा छळाच्या आरोपामुळे नवविवाहितेच्या मृत्यूची धक्कादायक घटना समोर आली आहे. लग्नाला अवघे तीन महिने झाले असताना बाणेर परिसरातील राहत्या इमारतीवरून उडी मारून २७ वर्षीय विवाहितेने जीवन संपविल्याची घटना घडली. या प्रकरणी सासरच्या चार जणांविरुद्ध बाणेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, गंगासाठी तेजस बेंबळकर यांचे स्थळ सुचविण्यात आले होते. तेजस यांचे अमेरिकेत उच्च शिक्षण झाले असून ते पुण्यात आयटी क्षेत्रात कार्यरत आहेत. १७ मे २०२५ रोजी कलबुर्गी येथे पाहणी कार्यक्रम पार पडला. त्यानंतर १५ जून २०२५ रोजी वाकड येथे साखरपुडा झाला.

प्राध्यापकांनी आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार २० आहेर नेले होते. त्यात कपडे, चांदीचे ताट, चांदीचा नंदी असा आहेर होता. हा आहेर पाहून तेजसची आई उज्वला बेंबळकर म्हणाली की, पाहुण्यांमध्ये आमची इज्जत काढून असला भिकारी फालतु आहेर आणला आहे का?आम्ही तुम्हाला भिकारी दिसत आहोत का? आमचे कुटुंब हे प्रतिष्ठित असून आमचे पाहुणे हे उच्च वर्गातील असून त्यांच्या समोर तुम्ही असला आहेर आणला का, असे बोलू लागल्या. सर्वांसमोर प्राध्यापक कुटुंबाचा अपमान केला.

साखरपुड्यावेळी आणलेल्या आहेरावरून वधूपक्षाचा अपमान करण्यात आल्याचा आरोप आहे. लग्नासाठी प्रतिष्ठित मंगल कार्यालय व हॉटेलची मागणी करण्यात आली. मुलीच्या सुखासाठी वडिलांनी आपला प्लॉट विकून सुमारे १ लाख ८० हजार रुपये खर्च करून मंगल कार्यालय निश्चित केले. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी विवाह पार पडला.फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, लग्नानंतर गंगाला २१ तोळे सोने आणण्याची मागणी करण्यात आली. तसेच लग्न मनासारखे झाले नाही, असा आरोप करून तिचा मानसिक छळ करण्यात येत होता. सोलापूर येथे 5 फेब्रुवारी रोजी झालेल्या एका लग्नसमारंभात गंगाने वडिलांना छळाबाबत माहिती दिली होती.

पुढे १९ फेब्रुवारी रोजी बाणेर येथील राहत्या इमारतीवरून उडी मारून गंगाने जीवन संपविले. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, पतीकडूनही तिला मानसिक त्रास दिला जात होता. तिला कमी लेखणे, शिक्षण व व्यक्तिमत्त्वावर टीका करणे, तसेच वैवाहिक नात्यात दुरावा ठेवणे, अशा तक्रारी गंगाने आपल्या कुटुंबीयांना व मैत्रिणींना सांगितल्या होत्या. अंत्यसंस्कारानंतर वडिलांनी बाणेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक बाबासाहेब झरेकर करत आहेत. पोलिसांकडून हुंडा छळ व आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपांची चौकशी सुरू असून संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. ही घटना समोर आल्यानंतर शहरात पुन्हा एकदा हुंडा प्रथेविरुद्ध संताप व्यक्त केला जात आहे.



**महिलेला तीन पुरुष सतत ब्लॅकमेल करायचे**

कुटुंबाच्या म्हणण्यानुसार, मृत महिलेला तीन पुरुष सतत ब्लॅकमेल करत होते. त्यांनी तिचा मानसिक छळ करत तिचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पैसे उकळले. कुटुंबाचा दावा आहे की, त्यांनी आरोपींनी पाठवलेले व्हॉट्सअॅप चॅट्स आणि व्हिडिओ पुरावा म्हणून पोलिसांकडे सादर केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००० १४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com